गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज*
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय काटेड (संस्थापक) Mo. 9372444001





# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा


सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी..
विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ ॲण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, शनिवार दि. १२.०४.२०२५ | अंक नं. ११ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# आर्थिक गुन्ह्यांच्या तपासात पोलिसांची भूमिका संशयास्पद

## पोलिस अधिक्षकांच्या आदेशालाही केराची टोपली, विशेष पोलिस महानिरीक्षकांकडे तक्रार

नगर – नगरमध्ये दाखल झालेल्या आर्थिक गुन्ह्यांच्या तपासात पोलिसांची भूमिका संशयास्पद असून आरोपींना सहाय्य करणारी असल्याची तक्रार काही ठेवीदारांनी थेट नाशिक परिक्षेत्राच्या विशेष पोलिस महानिरीक्षकांकडे केली आहे. विशेष म्हणजे आर्थिक गुन्ह्यांबाबत पोलिस अधिक्षक राकेश ओला यांनी जिल्ह्यातील सर्व पोलिस अधिकाऱ्यांना परिपत्रक काढून दिलेल्या आदेशालाही काही पोलिस अधिकाऱ्यांनी केराची टोपली दाखविली असल्याचे या तक्रारीत म्हटले आहे.

शहरासह जिल्ह्यात विविध पोलिस ठाण्यात पतसंस्था, बँका, मल्टीस्टेट निधी लिमिटेड संस्था यासारख्या वित्तीय संस्थांमध्ये ठेवीदारांच्या झालेल्या फसवणुकीबाबत गुन्हे दाखल झालेले आहेत. तसेच सध्याही अधूनमधून होत आहेत. या गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने पोलिस अधिक्षक राकेश ओला यांनी २ वर्षांपूर्वी म्हणजे ४ एप्रिल २०२३ रोजी जिल्ह्यातील सर्व पोलिस अधिकाऱ्यांना एक परिपत्रक काढलेले आहे. यामध्ये म्हटले आहे की, आर्थिक गुन्हे हे फौजदारी गुन्ह्यांपेक्षा वेगळ्या स्वरुपाचे असतात. आर्थिक गुन्ह्यांमुळे केवळ आर्थिक नुकसान होत नाही तर व्यक्ती व राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला नुकसान होवून सुरक्षिततेवर देखील त्यांचा परिणाम होतो. गेल्या काही वर्षांत आर्थिक गुन्हे घडत असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच दरवर्षी आर्थिक गुन्ह्यात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. अशा गुन्ह्यांमध्ये सर्व स्तरातील लोकांचा पैसा फसवणुक करुन अथवा अन्य मार्गाने लुबाडला जात आहे. आर्थिक गुन्ह्यांतील अपहारीत रक्कमेची मोठी वाढ लक्षात घेता पोलीस अधीक्षक कार्यालय येथे आर्थिक गुन्हे शाखेची स्थापना करण्यात आलेली आहे. पोलीस स्टेशन स्तरावर दाखल झालेले आर्थिक फसवणुकीचे गुन्हे हे आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करताना खालील निकष असलेल्या मुद्यांचा विचार करुन गुन्हे वर्ग करावेत.

### आर्थिक गुन्हे शाखेकडे गुन्हे वर्ग करण्याचे निकष

कंपनी ॲक्ट २०१३ या कायद्याअंतर्गत नोंदविल्या कंपनीकडुन मोठ्या स्वरुपाची फसवणुक, क्लिष्ट, किचकट व गुंतागुंतीचे बँकांचे संबधीत मोठया स्वरुपाचे अपहार, सहकारी संस्था अधिनियम १९६० या कायद्याखाली नोंदलेल्या पतसंस्था व इतर संस्थांकडून फसवणूक, मल्टीस्टेट सोसायटी ॲक्ट २००२ या कायद्याअंतर्गत नोंदलेल्या सोसायटी व इतर संस्थांकडुन फसबणुक, मल्टीलेव्हल मार्केटींग कंपनी किंवा पॉन्झी स्कीमव्दारे होणाऱ्या मोठ्या प्रमाणातील फसवणूक, इतर सर्वसामान्य प्रकारातील मोठ्या स्वरुपाचे अपहार व फसवणुक, जमीन खरेदी विक्री, घरकुल, शैक्षणीक संस्था व नोकरी संदर्भात मोठ्या प्रमाणातील फसवणुक, परदेशात माल आयात निर्यात संबंधित फसवणूक, विविध प्रकारची कर चुकवेगिरी, शेअर्स संबंधाने झालेली फसवणूक, बनावट मुद्रांक संबंधित गुन्हे व गुंतवणुकीचे फसवणुकी संबंधित गुन्हे.

अशा गुन्ह्यांचे तक्रारीमध्ये अंतर्भुत रक्कम एक कोटी व त्यापेक्षा जास्त, त्यात ठेवीदार, गुंतवणुकदार, पिडीत व्यक्तींची संख्या १० पेक्षा जास्त, पतसंस्था, सोसायट्या, बँका व इतर संस्थांतील ठेवीदार, गुंतवणुकदारांचे फसवणुकीबाबत, किचकट, क्लिष्ट व गुंतागुतीचे व्यवहारांचा असेल तर अशा तक्रारींबाबत अर्जचौकशी, गुन्ह्यांचा आमचे पूर्वपरवानगीने आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात येईल, असे पोलिस अधिक्षक राकेश ओला यांनी स्पष्ट केलेले आहे. मात्र या आदेशाला जिल्ह्यातील अनेक पोलिस अधिकाऱ्यांनी केराची टोपली दाखविली असल्याचे या तक्रारीत म्हटले आहे.

### भाग्यलक्ष्मी मल्टीस्टेटचा तपास संशयास्पद

नगरच्या एमआयडीसी पोलिस ठाण्यात भाग्यलक्ष्मी मल्टीस्टेट को-ऑप सोसायटीच्या संचालक मंडळाविरोधात ठेवीदारांची फसवणूक तसेच महाराष्ट्र ठेवीदारांचे वित्तीय संस्थांमधील हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल झालेला आहे. सदर गुन्ह्यातील अपहाराची रक्कम ४८ कोटींपेक्षा जास्त असल्याने सदर गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करणे गरजेचे होते. तशी मागणी ठेवीदारांनी एमआयडीसी पोलिसांकडे केली. मात्र पोलिसांनी त्याकडे दुर्लक्ष करून अशी मागणी करणाऱ्या ठेवीदारांनाच आरोपीसारखी वागणूक देत अनेकदा पोलिस ठाण्यातून हाकलून दिल्याचा गंभीर आरोप या संस्थेत ठेवीची रक्कम अडकलेले वयोवृद्ध ठेवीदार सुरेश श्रीधर गोफणे यांनी विशेष पोलिस महानिरीक्षकांकडे केलेल्या तक्रारीत केला आहे. पोलिसांची ही भूमिका आरोपींना सहाय्य करणारी असल्याचे त्यांनी या तक्रारीत म्हंटले आहे.

### 'ध्येय मल्टीस्टेट'चा तपासही संथ गतीने

नगर शहरासह जिल्ह्यात 'ध्येय मल्टीस्टेट'च्या शाखा सुरु करून ठेवीदारांना ज्यादा परताव्याचे आमिष दाखवत कोट्यावधी रुपयांच्या ठेवी गोळा करून त्या परत न देता सर्व शाखा बंद करून ठेवीदारांची कोट्यावधींची फसवणूक केल्याप्रकरणी ठेवीदार सुजाता संदीप नेवसे यांनी १६ मे २०२४ रोजी नगरच्या तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिलेली आहे. त्यावरून ११२ ठेवीदारांची ५ कोटी ७८ लाख ६५ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा गुन्हा संस्थेचा चेअरमन विशाल भागानगरे याच्यासह ७ संचालकांच्या विरुद्ध दाखल झालेला आहे. त्यानंतर अपहाराची रक्कम आता ७ कोटी ६ लाख ३० हजारांवर पोहोचली आहे. या रकमेत अजूनही वाढ होण्याची शक्यता आहे. या गुन्ह्याचा तपास तोफखाना पोलिसांकडून अतिशय संथ गतीने आणि आरोपींना सहाय्य होईल, अशा पद्धतीने सुरु असल्याचा आरोप ठेवीदारांकडून केला जात आहे.

### ११ महिने झाले तरी विशाल भागानगरेसह अन्य आरोपी सापडेनात

पोलिसांच्या या भूमिकेमुळेच २ संचालकांना अटकेपासून संरक्षण मिळालेले आहे. यातील एक आरोपी व्हाईस चेअरमन रोहिदास सत्यदेव कवडे याला तब्बल ९ महिन्यांनंतर २७ फेब्रुवारी २०२५ रोजी पोलिसांनी अटक केली. मात्र आता ११ महिने झाले तरी मुख्य सूत्रधार आणि संस्थेचा चेअरमन विशाल भागानगरेसह ४ जण अजूनही मोकाट फिरत आहेत. पोलिसांना ते का सापडत नाहीत? या मागील गौडबंगाल काय? असा सवाल ठेवीदार करत आहेत. या गुन्ह्याचा तपास योग्य रीतीने होवून ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळावेत, यासाठी हा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्याची मागणी ठेवीदारांनी अनेकदा केली. मात्र त्यांनाही तोफखाना पोलिसांनी तसेच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी आरोपींच्यासारखी वागणूक देत वेळोवेळी वाटे लावले आहे. त्यामुळे तोफखाना पोलिसांची भूमिकाही संशयास्पद असून, आता पोलिस अधिक्षक राकेश ओला यांनी यात लक्ष घालून ठेवीदारांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी ठेवीदार करत आहेत.



॥ भावपूर्ण श्रद्धांजली.. ॥
काळाचा महिमा काळच जाणे,
कठीण आपले अचानक जाणे..
आजही घुमतो स्वर आपला कानी,
वाहताना श्रद्धांजली डोळ्यांत येते पाणी..
चतुर्थ स्मृतिदिनानिमित्त आपल्या पवित्र स्मृतीस
भावपूर्ण आदरांजली...
स्व. कैलाश गौरीलाल खंडेलवाल
(स्व. दि. १२/०४/२०२१)
शोकाकूल
ओमप्रकाश गौरीलाल खंडेलवाल | कृष्णा कैलाश खंडेलवाल | हिदुल कृष्णा खंडेलवाल
कृष्णा इलेक्ट्रॉनिक्स सर्जेपुरा | ओमप्रकाश ट्रेडिंग कंपनी टी.व्ही. सेंटर | प्रिया इलेक्ट्रॉनिक्स रामचंद्र खुंट
मनोज इलेक्ट्रॉनिक्स रामचंद्र खुंट | तिलक इलेक्ट्रॉनिक्स एम.आय.डी.सी. | खंडेलवाल स्टील एम.आय.डी.सी. | ओम ट्रेडर्स रामचंद्र खुंट

शुभविवाह सोहळ्याकरिता
ऑर्केस्ट्रा स्वर साधना
प्रा. जनार्धन बोडखे (संगीत विशारद)
संपर्क : 9421479180

अकौंटंट पाहिजे
टॅलीचे ज्ञान आवश्यक
आकर्षक पगार+ पी.एफ, मेडिक्लेम, इन्शुरन्स सुविधा उपलब्ध.
(कमीत कमी ३ ते ५ वर्षांचा अनुभव आवश्यक)
प्रॉम्प्ट ट्रूलिंग इंडिया प्रा.लि.
9765111511,9922233900


• १८ वे • पुण्यस्मरण
आठवण तुमची प्रत्येक क्षणाला,
व्याकुळ करते आमच्या मनाला..
आज जरी नाही तुम्ही आमच्यात,
सदैव राहतील तुमच्या
आठवणी आमच्या मनात..
स्व. जितेंद्र भगवानदास छाबरिया
स्व.दि.१२/४/२००७
आपल्या पावन स्मृतिस भावपूर्ण श्रद्धांजली
- दुःखांकित -
समस्त छाबरिया परिवार
अ.नगर

आपण दिलेल्या संधीबद्दल मनापासून आभार..
आपल्या भावी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा..
पालवे गॅस्ट्रो हील
सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल
विस्तारित इमारतीचा लोकार्पण सोहळा
रविवार, दि. १३ एप्रिल २०२५
मॉडेल कॉलनी रोड, तारकपूर बसस्टॅण्डमागे, अहिल्यानगर


N' ART GLASS HOUSE
Fenesta Better by Design
Upvc window & Door | Aluminum Composite Paneling | Structural Glazing Glass
Automatic Sensor Glass Door | All Types of Glass Partition Work
एन आर्ट ग्लास हाऊस
सुरज नन्नवरे । धिरज नन्नवरे
एन. आर्ट ग्लास हाऊस, न्यु टिळक रोड, अहिल्यानगर । मो.नं. ९९७०४ ५१९२९

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# हिंदू धर्मियांच्या धार्मिक भावना दुखवल्याप्रकरणी जिहादी प्रवृत्तींच्या लोकांवर गुन्हा दाखल करावा

**सकल हिंदू समाजाच्या शिष्टमंडळाची पोलिस अधिक्षकांकडे मागणी**

नगर – हिंदू धर्मियांच्या धार्मिक भावना दुखवल्याप्रकरणी अल्तमस जरीवाला याच्यासह जिहादी प्रवृत्तींच्या लोकांवर गुन्ह्याची नोंद करण्याची मागणी हिंदू सकल समाजाच्या वतीने ११ एप्रिल रोजी पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

या निवेदनात म्हटले आहे की नुकत्याच झालेल्या रामनवमी मिरवणुकीत कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही. मिरवणूक शांततेत पार पडल्याने जिहादी मानसिकतेच्या लोकांचा हिरमोड झाला असून नगर शहरात तणाव निर्माण व्हावा व त्याचा फायदा या विघ्नसंतोषी लोकांना व्हावा या उद्देशाने या लोकांनी मिरवणुकीत कुठलाही वादग्रस्त फोटो झळकावलेला नसताना व सदर मिरवणुकीत पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, शहर विभागाचे उपअधीक्षक अमोल भारती, तसेच दोन्ही पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे व आनंद कोकरे यांच्यासह शेकडो पोलीस अधिकारी कर्मचारी या मिरवणुकीत उपस्थित असताना कुठल्याही प्रकारचा वादग्रस्त फ्लेक्स त्यांना दिसून आला नाही. कारण तसा कुठलाही फ्लेक्स मिरवणुकीत नव्हता.

त्यामुळे मॉर्फ केलेला फ्लेक्सचा फोटो दाखवून कोतवाली पोलीस ठाणे येथे मोठ्या प्रमाणात बेकायदा जमाव गोळा करुन पोलीस ठाण्याच्या आवारात उभे राहून नगर शहरातील नागरिकांना धमकावून शहराचे वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी संबंधितांवर तत्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच नगर शहराचे नाव अहिल्यानगर असताना जाणून बुजून अहमदनगर असा उल्लेख करुन आमच्या धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी त्यांच्यावर तत्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा. तरी या प्रकरणाची वेळीच दखल घेऊन अहिल्यानगर शहर विभागावर याचा परिणाम होणार नाही याची काळजी घ्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली.


हिंदू धर्मियांच्या धार्मिक भावना दुखवल्याप्रकरणी जिहादी प्रवृत्तींच्या लोकांवर गुन्हा दाखल करावा या मागणीचे निवेदन पोलिस अधिक्षक कार्यालय येथे देताना सकल हिंदू समाजाचे शिष्टमंडळ.

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१




### 'ग्रोक' – एआय नकारात्मक बनले तर...

एआयने (कृत्रिम बुद्धिमत्ता) मानवी वाईट प्रवृत्तींतही प्राविण्य मिळवले तर?... मोठमोठ्या कंपन्या व्यावसायिक फायद्यासाठी एआयचा फायदा, गैरफायदा घेत आहेत.

सध्या एलॉन मस्कच्या एक्स प्लॅटफॉर्ममध्ये 'ग्रोक एआय' वरून वाद वाढलाय.

एका एक्स वापरकर्त्याने ग्रोकला १० सर्वोत्तम म्युच्युअल्स (परस्पर संपर्क असलेले खाते) कोणते असे विचारताच त्यावर एआयने अत्यंत उद्धट भाषेत हिंदी स्लॅंगमध्ये उत्तर दिले. बिहारच्या तेजप्रताप यादव विषयी ग्रोकने गलिच्छ भाषेत उत्तर दिले.

त्याने अनेक राजकीय नेते, पत्रकार इतकेच काय एलॉन मस्कविषयीही कठोर भाषेत प्रतिक्रिया दिल्या. म्हणूनच अनेक विचारवंत एआय विकसित करताना 'एथिक्स' म्हणजेच नैतिकता यावर भर देतांना भर देण्याचा आग्रह धरतात.

लार्ज लॅंग्वेज मॉडेल म्हणून ग्रोकच्या मुलभूत प्रशिक्षणात हे अंतर्भूत आहे की, विचारलेला प्रश्न ज्या भाषेत असेल त्याचे उत्तर त्याच भाषेत द्यावे.

ग्रोकचे उत्तर देण्याचे स्वरूप केवळ भाषेपुरते मर्यादित नाही. जर तुम्ही बुद्धिमत्तेचा प्रश्न विचारलात तर ते अत्यंत हुशारीने उत्तर देईल. तुम्ही विनोद कराल तर तो अजून मोठा विनोद ठरेल. फेक न्यूजचाही त्याच शैलीत उत्तर देईल. म्हणूनच इतर चॅटप्रणाली ग्रोकच्या तुलनेत मर्यादित वाटतात.

तरीपण ग्रोकचे मुद्दे विचारात घेतल्यास भविष्यात एआयची पुढील आवृत्ती फसवणूक अन् षड्यंत्र रचण्यातही आघाडी घेईल की काय अशी भीती वाटू लागली आहे. स्मार्ट व तरुणांनो सावधान बरं...

# एमआयडीसी पोलिस ठाण्याचे कॉन्स्टेबल नवनाथ दहिफळे ठरले बेस्ट कॉप ऑफ द मंथ

नगर – एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पो.कॉ. नवनाथ दहिफळे यांनी केलेल्या भरीव कामगिरीमुळे त्यांची मार्च २०२५ चे बेस्ट कॉप ऑफ द मंथ म्हणून निवड झाली. त्यांचा शेंडी येथील पोलीस मदत केंद्र उद्घाटन कार्यक्रमात विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे (नाशिक परिक्षेत्र) यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.


एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पो.कॉ. नवनाथ दहिफळे यांची मार्च २०२५ चे बेस्ट कॉप ऑफ द मंथ म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करताना विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, समवेत पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलिस अधिकारी संपत भोसले आदी.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे १०० दिवसांच्या कृती आराखडा उद्दिष्ट पूर्तीच्या अनुषंगाने पोलीस अधिकारी कर्मचारी यांची त्यांच्या कामातील प्रेरणा वाढवून सकारात्मक स्पर्धात्मक वातावरण तयार करण्याच्या दृष्टीने पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या संकल्पनेतून अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांच्या मार्गदर्शनात उपविभागीय पोलिस अधिकारी संपत भोसले यांनी केलेल्या मूल्यांकनात एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल नवनाथ दहिफळे यांची मार्च २०२५ चे बेस्ट कॉप ऑफ द मंथ म्हणून निवड केली.

पोलीस कॉन्स्टेबल नवनाथ दहिफळे यांनी चार गंभीर गुन्ह्यांमधील फरार आरोपींचा सोशल मीडियाचे तांत्रिक तपासणी व गुप्त बातमीदार याच्या सहाय्याने शोध घेऊन अटक केल्याची सर्वोत्तम कामगिरी केली.त्यामुळे त्यांची एमआयडीसी पोलीस ठाण्यातील मार्च २०२५ महिन्यातील बेस्ट कॉप म्हणून निवड करण्यात आली. त्यांचा एमआयडीसी पोलीस ठाणे अंतर्गत शेंडी बायपास चौक येथे आयोजित पोलीस मदत केंद्र उद्घाटन कार्यक्रमात विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे (नाशिक परिक्षेत्र) यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलिस अधिकारी संपत भोसले, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे स.पो.नि. माणिक चौधरी यांच्यासह एमआयडीसी पोलीस ठाण्याचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# मुकुंदनगर व भिंगार येथे गोमांस विक्री करणाऱ्या दोन दुकानांवर कारवाई

नगर – गोवंश जनावरांची कत्तल करण्यास व गोमांस विक्री करण्यास मनाई असतानाही गोमांस विक्री करणाऱ्या दोन दुकानांवर भिंगार कॅम्प पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत ११ हजार ३०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करुन तिघांना ताब्यात घेतले. ही कारवाई भिंगार येथील सदरबाजार आणि मुकुंदनगर येथे ११ एप्रिल रोजी केली.

या बाबतची माहिती अशी की भिंगार पोलिसांना मिळालेल्या माहितीवरुन पोलिसांनी सदर बाजार मधील पोस्ट ऑफिस शेजारी गोमांस विक्री होत असलेल्या पत्राच्या टपरीमध्ये छापा टाकला. या कारवाईत सोहेल राजू कुरेशी (वय २४) व सोहेल उर्फ सोहेब इकबाल कुरेशी (वय २४, दोघे रा. सदर बाजार, भिंगार) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ६ हजार रुपये किमतीचे ३० किलो गोमांस, वजन काटा, तराजू असा मुद्देमाल जप्त केला.

दुसऱ्या कारवाईत मुकुंद नगर येथील नगरी चहा समोर गोमांस विक्री होत असलेल्या गाळ्यात छापा टाकला. या कारवाईत असलम छोटू शेख (वय ४९, रा. सहारा कॉर्नर, गजानन हाउसिंग सोसायटी, मुकुंद नगर) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून ३ हजार ६०० रुपये किमतीचे १२ किलो गोमांस, एक लहान चाकू, व लोखंडी सत्तूर, लोखंडी तराजू व लोखंडी माप मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल झाले असून पुढील कारवाई पोलीस हवालदार गारुडकर व पोलीस हवालदार आय. आय. पठाण हे करीत आहे.


## बेबीबाई शिंगवी यांचे अल्प आजाराने निधन



नगर – कडा येथील रहिवासी सौ. बेबीबाई शांतीलाल शिंगवी (वय ६८) यांचे १२ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर कडा अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शांतीलाल शिंगवी सर यांच्या त्या पत्नी तसेच मनोज व संजय शिंगवी यांच्या मातोश्री होत.


## सुरेश भांबरकर यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – सावेडी, भूतकरवाडी येथील रहिवासी सुरेश गजानन भांबरकर (वय ६५) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले आहे. भाजीविक्रेते म्हणून ते सर्वांना परिचित होते. भाजी विक्रेते देवेंद्र भांबरकर यांचे ते वडिल होत. सामाजिक व धार्मिक कार्यात त्यांचे योगदान होते.

त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी सुना, नातवंडे, जावई, पुतणे, असा परिवार आहे.

## दिलीपसिंह चौहान यांचे हृदयविकाराने निधन



नगर – विनायकनगर येथील रहिवासी दिलीपसिंह किसनसिंह चौहान (वय ७०) यांचे ११ एप्रिल रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी श्रीमती सरिता चौहान, मुलगा गजाननसिंह चौहान, मुलगी योगिता चौहान, सुन, नातवंडे असा परिवार आहे. ते परिसरात चौहान काका या नावाने परिचित होते.

## सिमरतमल पोखर्णा यांचे अल्प आजाराने निधन



नगर – केडगाव येथील रहिवासी सिमरतमल भागचंद पोखर्णा (वय ७२, ढवळपुरीवाला) यांचे १२ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते जितेंद्र पोखर्णा यांचे वडील होत. मार्केटयार्ड येथील शेठीया पोखर्णा गुळाचे व्यापारी म्हणून प्रसिद्ध होते.

## बेबीबाई गुंदेचा यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – पुणे येथील रहिवासी श्रीमती बेबीबाई रमेशलाल गुंदेचा (वय ७५, तळेगाववाला) यांचे ११ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर पुणे कात्रज येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या रविंद्र शेलोत यांच्या भगिनी होत.



**हनुमान चालिसा पाठ**

**रविवार दि. १३/०४/२०२५**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**
**विर बजरंगी प्रतिष्ठान,** प्रशांतनगर, पाईपलाईन रोड, भिस्तबाग, सावेडी, विनल करंजकर- ८९८०००८२७४, अक्षय भालेराव- ८३०८४३१९०७

## केडगाव परिसरातून २० वर्षीय तरुणी बेपत्ता

नगर – बाजारात भाजीपाला आणायला गेलेली २० वर्षीय तरुणी बेपत्ता झाल्याची घटना केडगाव परिसरात १० एप्रिल रोजी सकाळी घडली आहे. या प्रकरणी बेपत्ता तरुणीच्या नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार कोतवाली पोलिसांनी हरवल्याची नोंद करण्यात आली आहे.

केडगाव परिसरातून १० एप्रिल रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास २० वर्षीय तरुणी भाजीपाला आणण्यासाठी बाजारात जाते असे सांगून घरातून बाहेर पडली. ती उशिरापर्यंत घरी परत आली नाही. त्यामुळे तिच्या घरच्यांनी तिचा केडगाव परिसर, तिच्या मैत्रिणीकडे, नातेवाईकांकडे, नगर शहरात शोध घेतला असता ती कोठेही मिळून आली नाही. त्यानंतर त्यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात जावून माहिती दिली.

पोलिसांनी या माहितीवरून हरविल्याची नोंद केली असून पोलीस तिचा शोध घेत आहेत.

## मच्छिंद्र (अण्णा) भवार यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – कारेगाव येथील शेतकरी मच्छिंद्र (अण्णा) विठ्ठल भवार (वय ७५) यांचे अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, एक मुलगा, मुली, सुन, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्रीरामपूर तालुका केमिस्ट अँड ड्रगीस्ट असोसिएशनचे माजी अध्यक्ष व भळगट हॉस्पिटल जवळील मनिषा मेडिकलचे मालक जालिंदर भवार यांचे वडील, नवनाथ व प्रविण भवार यांचे चुलते होत.

# चिकन चिल्लीचे बिल मागितल्याने दुकानदार महिलेला मारहाण करत विनयभंग; गुन्हा दाखल

नगर – चिकन चिल्ली खाल्ल्याचे बिल मागितल्याचा राग घेऊन एकाने ३६ वर्षीय महिलेस शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन तिला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करून तिचा विनयभंग केल्याची घटना स्टेशन रोडवरील नगर कॉलेज जवळ एका चायनीज दुकानात ११ एप्रिल रोजी रात्री ९.३० वाजता घडली.

याबाबतची माहिती अशी की नगर स्टेशन रोडवरील एका चायनीज दुकानात अशपाक इस्माईल शेख (रा. बाबा बंगाली चौक, अ.नगर) हा दारू पिऊन चिकन चिल्ली खाण्यास गेला. तेथे त्याने चिकन चिल्ली खाल्ल्यानंतर त्यास काउंटर वरील महिलेने बिल मागितले. याचा राग येऊन अशपाक याने महिलेस शिवीगाळ करुन तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तिचा हात पकडून तिला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करुन तिचा विनयभंग केला. तसेच तुला बघून घेतो, मला बाहेर भेट तुला जीवेच ठार मारेल अशी धमकी देऊन तिथून निघून गेला.

याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीवरुन अश्फाक शेख याच्याविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे.

# महानगरपालिकेच्या जागेवर 'ताबा' मारत खोदली विहीर

## पिंपळगाव माळवी येथील प्रकार, दोघा जणांवर गुन्हा दाखल

नगर – नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथील महापालिकेच्या मालकीच्या शेत गट नं.१०३० मधील जागेवर ताबा मारत त्या ठिकाणी पोकलेन मशीन व ट्रॅक्टरच्या सहाय्याने बेकायदेशीर पणे विहीर खोदून शासकीय जागेचे नुकसान केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत महापालिका पाणीपुरवठा विभागातील शाखा अभियंता प्रदीप सदाशिव ढगे (वय ४६, रा. गुलमोहर रोड, सावेडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार अशोक जोगदे व किशोर शिकारे (रा. धनगरवाडी, ता.नगर) या दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे. या दोघांची धनगर वाडी येथे संस्था आहे. या संस्थेसाठी पाणी पुरवठा व्हावा म्हणून त्यांनी महापालिकेकडे पिंपळगाव माळवी तलाव परिसरात विहीर व बोअरवेल खोदण्यास परवानगी द्यावी अशी मागणी केली होती. मात्र महापालिकेने त्यांना केवल बोअरवेल घेण्याची परवानगी दिली होती. त्याच्या अटी, शर्तींची पूर्तता ही त्यांनी अद्याप केलेली नसताना आणि विहीर खोदण्यास परवानगी नाकारलेली असतानाही त्यांनी त्या ठिकाणी पोकलेन मशीन व ट्रॅक्टरच्या सहाय्याने बेकायदेशीर पणे विहीर खोदून शासकीय जागेचे नुकसान केले. ही बाब निदर्शनास आल्यावर त्या दोघांना महापालिकेच्या वतीने समज देण्यात आली होती. तरीही त्यांनी विहीर खोदल्याने अखेर वरिष्ठांच्या आदेशानुसार महापालिका पाणीपुरवठा विभागातील शाखा अभियंता प्रदीप ढगे यांनी ११ एप्रिल रोजी सायंकाळी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी अशोक जोगदे व किशोर शिकारे यांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३२६ (ब), ३२४ (४), ३ (५) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# झेरॉक्स काढण्यासाठी गेलेल्या तरुणीसोबत दुकानदाराचे गैरवर्तन

**मोबाईलमधून खाजगी फोटो काढून घेतले, विनयभंगाचा गुन्हा दाखल**

नगर – झेरॉक्स दुकानदाराने ब्लूटूथच्या साह्याने झेरॉक्स काढण्याच्या बहाण्याने २० वर्षीय तरुणीचा मोबाईल घेऊन तिच्या मोबाईलमधील फोटो घेऊन इंस्टाग्राम अकाउंटवर फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून तिच्यावर छुपी नजर ठेवत गैरवर्तन केल्याची घटना नगर रेल्वे स्टेशन रोडवरील पंचायत समिती कार्यालयासमोरील सुपर फाईन झेरॉक्स दुकान येथे ११ एप्रिल रोजी दुपारी घडली.

याबाबत पिडीत तरुणीने कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी तरुणी केडगाव उपनगरातील रहिवाशी असून ती स्टेशन रोडवरील सुपरफाइन झेरॉक्स दुकानात रेशन कार्डची झेरॉक्स काढण्याकरिता गेली होती. त्यावेळी दुकानातील तरुणाने त्याचे मोबाईलवर पीडीएफ पाठवण्यास सांगितले. त्यावर त्या तरुणीने मोबाईलवर पीडीएफ पाठवली असता त्याने पीडीएफ वरुन झेरॉक्स निघत नाही असे सांगून ब्लूटूथने डॉक्युमेंट शेअर करा असे सांगितले. त्या तरुणीस ब्लूटूथने डॉक्युमेंट शेअर करता येत नसल्याने दुकानातील तरुणाने तिच्याकडून तिचा मोबाईल घेतला व दहा पंधरा मिनिटे जवळ ठेवला. त्यानंतर थोड्यावेळाने तिला तिचा मोबाईल व रेशन कार्डची झेरॉक्स दिली.

तरुणी तेथून निघून गेल्यानंतर थोड्यावेळात तिने मोबाईल चेक केला असता मोबाईलमधून तिचे फोटो सेंड होताना दिसले व सर्व फोटो सक्सेसफुली सेंड असे नोटिफिकेशन आले. तसेच तिच्या इंस्टाग्राम आयडी वरून तिच्या संमतीशिवाय अर्शद सय्यद.१५ या इंस्टाग्राम अकाउंटवर फ्रेंड रिक्वेस्ट पाठविण्यात आल्याचे दिसले. तिने रिक्वेस्ट पाहिल्यावर अकाउंटच्या प्रोफाईलला तरुणाचा फोटो दिसला. त्यावेळी तिच्या लक्षात आले की झेरॉक्स दुकानातील तरुणाने ब्लूटूथच्या साह्याने झेरॉक्स काढून देण्याच्या बहाण्याने तिचा मोबाईल घेतला व तिच्या मोबाईलमधील तिचे फोटो स्वतःच्या मोबाईलमध्ये टाकून घेतले व तिची संमती नसताना तिचे मोबाईलमधील इंस्टाग्राम अकाउंट आयडी बघून फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली. अशा रीतीने तिच्यावर छुपी नजर ठेवली. याबाबत त्या तरुणीने तिच्या नातेवाईकांना सर्व सांगितले. तिच्या नातेवाईकांनी झेरॉक्स दुकानात जाऊन चौकशी केली असता त्या तरुणाचे नाव अर्शद नाज हसन सय्यद (वय २६ रा. सावजी थ्रेड जवळ, आशा टॉकीज चौक) असे असल्याचे समजले. याप्रकरणी पोलीस ठाण्यात पिडित तरुणीने दिलेल्या फिर्यादीवरुन अर्शद सय्यद याचे विरुद्ध भा. न्या. सं. २०२३ चे कलम ७८ (२) प्रमाणे विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे.

## वीज चोरी केल्याप्रकरणी महिलेविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – घरगुती वापराच्या इलेक्ट्रिक मीटरमध्ये वीज वापराची नोंद कमी प्रमाणात होईल अशी कायमस्वरूपी व्यवस्था करून वीज चोरी केल्याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात वडगाव गुप्ता (ता. नगर) येथील महिलेविरुद्ध ११ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत महावितरण कंपनीचे भरारी पथकातील अभियंता हरिश्चंद्र पोपळघट यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. वडगाव गुप्ता येथील अंजनाबाई बाळासाहेब भोगे यांनी घरगुती वापराच्या इलेक्ट्रिक मीटर मध्ये वीज वापराची नोंद कमी प्रमाणात होईल अशी कायमस्वरूपी व्यवस्था करून सुमारे १२ महिन्याच्या कालावधीमध्ये वीज चोरी केली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अभियंता हरिश्चंद्र पोपळघट यांनी दिलेले फिर्यादीवरुन भारतीय विद्युत कायदा कलम १३५ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

## भरदिवसा घरफोडी; दागिन्यांसह रोकड लंपास

नगर – बंद फ्लॅटच्या दरवाज्याचे कुलूप कशाचे तरी साह्याने तोडून कोणीतरी अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करुन घरातील बेडरुममधील कपाटातून सोन्याचांदीचे दागिने व रोख रक्कम असा सुमारे २ लाख १४ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला. ही घटना वडगाव गुप्ता परिसरात ११ एप्रिल रोजी दुपारी चार ते सायंकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान घडली. याबाबत कुलदीप पंडित विघ्ने (वय २४, रा. साईराज नगर नवनागापूर) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी कुलदीप विघ्ने व त्यांची आई बाहेर गेलेले असताना कोणीतरी त्यांच्या बंद फ्लॅटच्या दरवाजाचे कुलूप कशाचेतरी सहाय्याने तोडून आत प्रवेश केला. सामानाची उचकापाचक करुन सामान अस्ताव्यस्त फेकले.

बेडरुम मधील कपाटाचे लॉक उचकाटून आतील १ तोळा वजनाची सोन्याची चैन, १ तोळा वजनाचे सोन्याचे गंठण, ११ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, पायातील चाळ, कमरेची चांदीची चेन, नाकातील मुरणी, सोन्याची नथ आणि ६० हजार रुपये रोख रक्कम असा २ लाख १४ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरुन नेला. चोरीची ही घटना निदर्शनास आल्यावर कुलदीप विघ्ने यांनी एमआयडीसी पोलिसांना माहिती दिली. ही माहिती मिळताच स.पो.नि. माणिक चौधरी, उपनिरीक्षक विकास जाधव यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी भेट देत पाहणी केली. याप्रकरणी कुलदीप विघ्ने यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम ३३१ (३), ३०५ प्रमाणे घरफोडीचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास विकास जाधव करीत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### रात्री झोप येत नसेल तर...

सध्या रात्री पुरेशी झोप न लागणे ही दैनंदिन समस्या बनली आहे. यासाठी झोपेच्या दोन तास आधी पुरेसे पाणी प्यायल्याने तुम्हाला रात्री चांगली झोप लागू शकते. संपूर्ण धान्य, तृणधान्य, पास्ता, क्रॅकर्स, ब्राऊन राईस यांचा आहारात समावेश करा. त्याचप्रमाणे कमी चरबीयुक्त पदार्थ आणि प्रोटीनचे सेवन करावे यामुळेही तुम्हाला शांत झोप लागू शकते.

## पाककला

### पनीर आलू कोफ्ते

**साहित्य :** १ कप पनीर २, उकळले बटाटे, थोडी कोथिंबीर, चिमूटभर मीठ, १ मिरची आणि १ कप बेसन, २ कप तेल, २ सर्व्हिंग स्पून तेल, हिंग, कढीपत्ता, १ लवंग, एक वेलची, दोन काळी मिरी, १ इचं आले, ६, ७ लसूण, १ कांदा, २ टोमॅटो, ६,७ काजू आणि मिरचीची उकडलेली पेस्ट, दीड टि स्पून हळद, १ टिस्पून धणे पावडर घाला, २ चमचा मलाई, आवश्यक असल्यास तिखट, मीठ, पनीर मसाला, २ ग्लास पाणी, थोडी कसुरी मेथी घाला, सजावटीसाठी बारीक चिरलेली कोथिंबीर

**कृती :** प्रथम पनीर, उकळले बटाटे आणि कोथिंबीर, चिमूटभर मीठ, एक मिरची आणि बेसन यांचा कोफ्ता बनवा. नंतर दोन कप तेलात गोल्डन ब्राऊन रंगावर तळून घ्या. नंतर दुसरी कढई गरम करा आणि दोन सर्व्हिंग स्पून तेल घाला आणि त्यात हिंग, कढीपत्ता, मोहरी, एक लवंग, एक वेलची, दोन काळी मिरी घाला. नंतर त्यात आले, लसूण, कांदा, टोमॅटो, काजू आणि मिरचीची उकडलेली पेस्ट घाला आणि तीन मिनिटे शिजवा आणि नंतर हळद आणि धणे पावडर घाला, पुन्हा मिक्स करा आणि दोन चमचा मलाई, पनीर, आलू कोफ्ते दोन मिनिटांनंतर मिरची पावडर (गरज असल्यास), मीठ आणि पनीर मसाला आणि दोन ग्लास पाणी घाला. पाच मिनिटे शिजवा नंतर थोडी कसुरी मेथी घाला आणि आणखी एक उकळी द्या. नंतर ही ग्रेव्ही कोफ्त्यावर फिरवून कोथिंबीरच्या पानांनी सजवा.

## वास्तू

### तुळशीची पूजा

हिंदू धर्मात तुळशीचे रोप पवित्र मानले जाते. ज्या घरात तुळशी असते, त्या घरात देवी लक्ष्मी आणि भगवान विष्णू यांचे आशीर्वाद नेहमीच राहताता असे मानले जाते. तुळशीची नियमीत पूजा केल्याने घरात धन, सुख आणि समृद्धी येते.

## सल्ला

त्वचा, टोन आणि शेपनुसार कपडे परिधाम केल्यास तुम्ही अधिक सुंदर दिसता.

## सौंदर्य

नारळाचे पाणी चेहऱ्यावर दिवसातून दोन वेळा लावल्याने डाग आणि सुरकुत्या कमी होण्यास मदत होते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

रविवार, दि. १३ एप्रिल २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, चित्रा २१|११, सूर्योदय ०६ वा. २५ मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** वैवाहिक जीवनात स्थिती अनुकूल राहील. अधिकारी वर्गाचे पाठबळ मिळेल. हितशत्रू पराभूत होतील.

**वृषभ :** अडचणी येण्याची शक्यता आहे. कामात गलथानपणा कराल. मोठ्यांचा आधार मिळाल्याने कार्य पूर्ण होतील.

**मिथुन :** मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. मातृपक्षाकडून सहयोग मिळेल. व्यवसायात स्थिती सुखद राहील.

**कर्क :** मित्रांची मदत मिळेल. आरोग्यविषयक समस्या निर्माण होतील. व्यापार-व्यवसायात परिस्थिती मध्यम राहील. राजकारणी लोकांसाठी चांगला दिवस.

**सिंह :** घरात किंवा पैशांमध्ये वाढ झाल्याने आपणास आनंद मिळेल. आपला निष्काळजी दृष्टीकोन नुकसानदायक ठरेल.

**कन्या :** व्यापारात नुकसान होईल. एका कामात अवनती झाली तर दुसऱ्या कामात लाभही होण्याची शक्यता आहे.

**तूळ :** आपल्या आत्मविश्वासाचा स्तर वाढेल. धार्मिक भावना वाढेल. सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूलता येईल.

**वृश्चिक :** अति श्रम करावे लागतील. व्यापार-व्यवसाय व आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगावी लागेल.

**धनु :** भाऊबंद डोके वर काढतील. आनंदाची बातमी मिळेल. मुलांच्या मनोरंजनासाठी खर्च होईल.

**मकर :** सामाजिक क्षेत्रातील लोकांना दिवस अनुकूल आहे. एखाद्या लांबच्या प्रवासाला जावेल लागेल.

**कुंभ :** एखादी व्यक्ती निष्कारण आपल्याला त्रास देईल. गृह भूमीसंबंधी विषयांमध्ये लाभ मिळेल.

**मीन :** नवीन कामात यश मिळेल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. शत्रू प्रभावहीन पडतील. आरोग्य उत्तम राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

नवरा : मला कविता खूप आवडते

बायको : मलाही विनोद खूप आवडतो

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* ब्रीक्स संघटनेच्या न्यू डेव्हलमेंट बँकेचा नवीन सदस्य कोणता देश बनला आहे? – इजिप्त


**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७१५४

सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७१५३ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) भारतातील एक घटकराज्य ४) जास्तीतजास्त; अतिशयपणा ६) तारुण्याचा पूर्वभाग ८) धाक; दरारा; जरब १०) उसाची पाने, तंतू वगैरे १२) आदिवासी समाजाचे एक नेते तथा स्वातंत्र्यसैनिक १४) जुने फाटके वस्त्र; चिंधी; लक्तर १५) फळातील रसाळ भाग; मगज १६) मानेची पुढची बाजू; कंठ; घसा १७) हुबेहूब; तंतोतंत २०) ऐनवेळी पळून जाणारा

**उभे शब्द :-** १) एक फूल; पंकज; कमळ २) थांबण्याची जागा (बस वगैरे); 'स्टेशन'चे मराठी रूप ३) नूतन; नवीन ४) फटीतून येणारा प्रकाशकिरण ५) पृथ्वीच्या पृष्ठभागावरची भुकटी; मृत्तिका ७) पलंग विणण्याची कापडी पट्टी ९) लांब कंटाळा आणणारी गोष्ट; मोठी दोरी; दोरखंड ११) मोठे भगदाड १२) राजा अकबराचा चतुर प्रधान १३) एक प्रकारची मोठी मुंगी; डोंगळा १४) ओळख १६) घाणेरडा; गलिच्छ १८) दगडाचा बारीक तुकडा; हिंदी उभा १९) फांदी; शाखा; डहाळी

# मुलांचे विश्व

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** दुसऱ्याच्या सावलीत उभे राहुन आपण आपली सावली गमावतो
पण स्वत:ची सावली तयार करण्यासाठी प्रत्येकाला उन्हात उभे राहावेच लागते.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### उसाचा रस काढणाऱ्या मशीनला घुंगरू का बांधले जातात?

उन्हाळ्यात दुपारी घराबाहेर पडल्यावर रस्त्यात रसवंती गृह दिसल्यास पावलं आपसूकचं त्याच्याकडे वळतात. मग थंडगार उसाचा रस पिवून तृप्त झाल्यासारखं वाटतं. रसवंती गृहामध्ये गेल्यावर तुम्ही एक गोष्ट पाहिली असेल की उसाचा रस काढणाऱ्या मशीनला घुंगरू बांधले जातात. पण उसाच्या मशीनचा आणि त्यावर लावलेल्या घुंगरांचा नेमका संबंध काय असा प्रश्न तुम्हाला कधी पडलाय का? तर याच उत्तर जाणून घेऊयात. उन्हाळ्यात उसाचा रस शरीराला हायड्रेट ठेण्याचं काम करत तसेच उसाच्या रसाचे आरोग्याला अनेक फायदे सुद्धा आहेत.

रसवंती गृहांमध्ये गेल्यावर तुम्ही मशीनमधून निघणारा छुमछुम हा आवाज ऐकला असेल. विजेवर चालणाऱ्या मशीनला बांधलेल्यया घुंगरांमधून येणारा हा आवाज ऐकल्यावर नेमका मशीन आणि घुंगरांचा काय संबंध असावा असा प्रश्न अनेकांना पडतो. तर यामागचं कारण हे रसवंती गृह चालकांच्या कृतज्ञतेच्या भावनेशी जोडलेला आहे. पूर्वीच्या काळी बैलांच्या सहाय्याने फिरवल्या जाणाऱ्या लाकडी घाण्यावर ऊसाचा रस काढला जायचा. आजही काही दुर्गम भागात उसाचा रस काढण्यासाठी लाकडी घाण्याचा वापर केला जातो. पण काळानुरुप या व्यवसायात बदल झाले आणि शहरी भागात उसाचा रस काढण्यासाठी बैलांच्या लाकडी घाण्याची जागा लोखंडी मशीन्सने घेतली. परंतू या बैलांनी आपल्याला एकेकाळी रसवंतीच्या माध्यमातून जगवलेलं याची आठवण या ठिकठिकाणी रसवंती गृह चालवणाऱ्या शेतकऱ्यांनी ठेवली आहे.

## धिटाई

एक कुत्रा एका गावातून चालला असता, त्या गावातील पाचपंचवीस कुत्रे मोठमोठ्याने भुंकत त्याच्या मागे लागले.

तो कुत्रा पळता पळता दमला. मग त्याने आपल्या मनात विचार केला की 'पळून जाता येणे आपणास शक्य नाही व कुत्र्याच्या तावडीतून सुटण्यास काही उपाय नाही', तेव्हा आता काय होईल ते होवो, आपणच यांजवर तुटून पडावे हे चांगले.

असा विचार करून तो उलटला आणि आपला पाठलाग करणाऱ्या कुत्र्यांवर मोठ्याने गुरगुरत तुटून पडला.

ते त्याचे धैर्य पाहून त्या कुत्र्यांची अगदी गाळण उडाली व हळूहळू ते सगळे पळून गेले.

**तात्पर्य :** भित्रेपणा पुष्कळ वेळा संकटास कारण होतो.

## रहमते दर्शन (भाग - १)



### उनका अद्भुत प्यार

महाराज जी ने जेब से बटुआ निकाला और मुझे कुछ पैसे देने का संकेत किया, पर मैं नासमझ इशारा न समझ सकी। मैंने कहा, आप का दिया सब कुछ है, पैसों की कोई आवश्यकता नहीं। आप तो बस दया करो। उन्होंने ढाड़स बंधाया और चले गये। उधर महाराज जी गये, इधर डॉक्टरों ने आकर बताया कि ऑपरेशन ठीक-ठाक हो गया है।

मेरे पति दो दिन बाद आये। वो महाराज जी को नहीं मानते थे। तीसरे दिन लड़के की हालत फिर बिगड़ गई । पाखाना अन्दर ही होने लगा। डॉक्टर घबरा गये। उधर परिवार के लोग भी घबराने लगे। डॉक्टरों ने जवाब दे दिया। कहने लगे, अब तो केवल दुआ ही काम कर सकती है। हम सब अपने-अपने तरीके से प्रभु से प्रार्थना करने लगे। मैंने अन्तर में सत्गुरु से प्रार्थना की कि महाराज जी, अपने विरद की लाज रखना । महाराज जी को पता चला, वे फिर अस्पताल आये। हम बड़े घबराये हुए थे। हमें ढाडस दिया और जेब में से बटुआ निकाल कर सौ-सौ के दो नोट हमारी तरफ़ किये। मैंने अपने पति से कहा, मैंने तो गलती की है, आप न करना । झोली फैला कर ले लो। मेरे पति ने मेरी लाज रख झोली फैला दी और महाराज जी ने वे नोट उनको दे दिये और ढेर सारा प्यार भी दिया। किसी ने सही कहा है कि डूबते को तिनके का सहारा होता है। मेरे पति महाराज जी को नहीं मानते थे, पर दुःख में उनका सहारा स्वीकार किया और डॉक्टर ने जो दे

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### मूल आधार चक्र

यह चक्र विभिन्न चक्रों के माध्यम से मिलने वाली ऊर्जा को स्थिर रखता है।

मूलाधार चक्र वह चक्र है जो हमारे भौतिक शरीर, सूक्ष्म शरीर और कारण शरीर की आधारशिला है। इस चक्र की उपस्थिति के अभाव में हमारा शरीर अस्तिव में आ नहीं सकता। हमारे भौतिक शरीर की सरंचना से पूर्व, हमारा सूक्ष्म शरीर आस्तिव में रहता है और उससे पहले कारण शरीर का अस्तित्व होता है अर्थात बिना कारण शरीर के, सूक्ष्म शरीर का और बिना सूक्ष्म शरीर के भौतिक शरीर का अस्तित्व असंभव है। मूलाधार ही हमारे तीनों शरीरों का मूल कारण है।

जिस व्यक्ति को अपने पूर्व जन्मों के कर्मों का नाश करते हुए, नव प्रारंभ का निर्माण एवं व्यक्तिव का विकास करना हो उसे इस चक्र का जागरण अवश्य ही करना चाहिये। आलसी और अकर्मण्य व्यक्ति का मूलाधार चक्र दोषपूर्ण होता है। ऐसे व्यक्ति विषय वासनाओं में लिप्त रहा करते हैं और पशुओं जैसा ही आचरण किया करते हैं। पृथ्वी तत्व की प्रधानता धारण करने वाला यह चक्र 'गरिमा' नामक सिद्धि का दाता है।

यहां पहुंचे हुए साधक को समाधी अवस्था निर्देश मिला करते हैं। देवत्व की स्थिति प्राप्त करने के लिए इस स्थान से ही छलांग लगाई जाती है। समस्त सिद्धियों का प्रदाता यह चक्र, व्यक्ति को ब्रह्माण्ड से जोड़ देता है। साधक, ब्रह्माण्डीय चेतना से जुड़ कर वह सब कुछ देख, सुन सकता है, जो घट चुका है, घट रहा है या घटने वाला है परन्तु अभी यह शोध का विषय है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - 'तीनाक्षरी महत्वाचा शब्द...'

अंथरुणावर अंग टाकण्यापूर्वी त्याने दोन्ही हात जोडले, दोन्ही डोळे मिटवुन घेतले. मनात म्हणाला, 'निसर्गा- परमेश्वरा, तुझे मनापासून आभार. आजचा एक चांगला दिवस मला, तु दाखवलास, गाडीवरुन पडलो. पायाला खरचटलं डॉक्टरांनी जखम निर्जंतुक केली. बँडेज लावलं. गोळ्या लिहून दिल्या. डॉक्टर आणि मेडिकलवाल्याचेही आभार. खरं तर गोळ्या तयार करणाऱ्या त्या कंपनीचे, कंपनीतील त्या कर्मचाऱ्यांचेसुध्दा मनापासून आभार. त्या कर्मचाऱ्याच्या कुटुंबियाचेही मनापासुन आभार. ऑफिसमध्ये आलो. काम केलं. कामात सहकार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे, साहेबांचेही मनापासुन आभार. कॅश काऊंटरवर काम करतांना दिवसभरात जवळपास शंभरपेक्षा अधिक, विविध स्वभावगुणांचे ग्राहक आले. त्यांचेही मनापासून आभार. चांगलं वागायचं कसं हे काही ग्राहकांकडुन शिकता आलं, त्या ग्राहकांचेही मनापासुन आभार. दुपारी जेवतांना, स्वयंपाक करणाऱ्या पत्नीचेही आभार मानले. पुन्हा काम सुरु केले. वेळ संपली. कॅश टॅली करतांना ८४० रुपयांचा फरक लागला. एका कर्मचाऱ्याने तो फरक शोधुन दिला. त्या कर्मचाऱ्याचे आणि त्या कर्मचाऱ्याच्या एच.ओ.डी.चेही आभार. कॅश तिजोरीत ठेवली. वर्षानुवर्षे कॅश तिजोरीत सुरक्षित राहाते म्हणून तिजोरीचेही आभार.

अशी चांगली, दणकट तिजोरी तयार करणाऱ्या कारखान्याचेही आभार. ती तिजोरी तयार करणाऱ्या कामगारांचेही आभार. ऑफिसमधुन घरी निघालो. काही अंतरावर येताच एक भिकारी दिसला. भिकाऱ्याच्या हातावर दहाची नोट ठेवली. मी त्या वेळेचे आभार मानले. एक सुसंधी वेळेनं देऊ केली. पुढे काही अंतरावर येताच रस्त्यावरच दोघांचं भांडण सुरु असलेलं दिसलं. लोकं उभे राहुन भांडण पाहु लागले. एका व्यक्तीने दोघांचे भांड, व्यवस्थितपणे समजावुन घेऊन, समजावुन सांगुन सोडवले. भांडण सोडवणाराचे आभार. घरी आलो. आज शाळेत काय-काय शिकवलं, हे माझ्या मुलीनं सांगितलं. सदर शिक्षकांचे आभार मानले. मुलीनेही मनापासून शिकुन घेतलं. तिचेही आभार मानले. हात, पाय धुतले. देवाजवळ बसुन, मनापासुन विश्वकल्याणाची प्रार्थना केली. चांगल्या विषयावरच्या पुस्तकाची काही पानं वाचली. ते पुस्तक लिहिणाऱ्या लेखकाचे, छापणाऱ्या प्रकाशनाचे आभार मानले. तिघेही जेवायला बसलो. अन्नपूर्णदेवतेची प्रार्थना केली. भाजीपाला विकणाऱ्या शेतकऱ्याचे आभार मानले.

'साहित्य सहवास' च्या लेख, लघुकथांना मेसेजेस, फोन करुन अथवा प्रत्यक्ष भेटीत अभिप्राय देणाऱ्या वाचक- चाहत्यांचे मी नेहमीच आभार म ानतो. वाचक - चाहत्यांचे अभिप्राय ही प्रचंड ताकद आहे माझ्यासाठी, अधिकाधिक लिहिण्यासाठीची. सर्वात महत्वाचे आभार. दै. नवामराठा परिवाराचे. ललितजी गुंदेचा साहेबांचे. ललितजींनी ही एक अत्यंत चांगली संधी मला २०१४ सालापासून उपलब्ध करुन दिली आहे.

वाचकहो, हे साहित्य सहवास वाचतांना तुम्हाला लक्षात आलं असेलच की आभार फक्त व्यक्तींचे मानायचे नाहीत तर निर्जिव वस्तु, सेवा देणाऱ्या व्यक्ती, कर्मचारी, कामगार, कारखाना ह्यासह वेळेचेही आभार मानायचे असतात. आपल्याला अत्यंत दुर्मिळ असा मनुष्यजन्म मिळाला आहे. म्हणून जीवनाचेही आभार मानायचे आहेत. जीवनात पावलोपावली, प्रत्येक क्षणाला आपल्याला नवं काही ऐकायला, वाचायला, पाहायला, करायला मिळत असतं. ह्या सगळ्यांचे आभार मानल्याशिवाय जीवन व्यर्थ आहे. आभार मानणं हा सुसंस्कार आहे. जो आपण स्वतः अंगी बाणवुन घेतलाच पाहिजे. नाहीतर असं ऐकायला मिळतं- 'अमुक-तमुक' चे कशाला आभार मानायचे? हे तर त्याचं काम, कर्तव्यच आहे.- तुमचं म्हणणं अगदी योग्यच आहेच. पण त्याचे आभार मानल्यामुळं आपण लहान होणार नाही. शिवाय आभार मानल्यामुळे त्यालाही आनंद होईल. समाधान मिळेल. आभार हा तीन अक्षरी शब्द आहे कृतज्ञता भाव व्यक्त करणारा, आपुलकी निर्माण करणारा, आपल्यावर सुसंस्कार झाले आहेत हे दर्शवणारा, समोरच्याला आनंद मिळवुन देणारा, वेळेचं मोल शिकवणारा आणि वेळोवेळी योग्य असंच वागा हे सांगणारा हा शब्द.

मनुष्य जीवनात अनेकांचे आभार मानावेत असे अनेक प्रसंग आपल्या दैनंदिन जीवनात घडत असतात. साहित्य सहवास प्रेसमध्ये छापले जाते. दै. नवा मराठा घरोघर पोहोचवणाऱ्या विक्रेत्यांचेही आभार. लिहिण्यासाठी वेगवेगळे विषय सुचवणाऱ्या माझ्या निरिक्षण, मनन, चिंतन, मेंदु अनेक पुस्तकांचे लेखक, मित्र मंडळी, नगरी कलाकार मंडळींसह स्नेहांकित परिवार आणि माझी पत्नी, मुली, जावई, भाऊ, भावजयीसह शेजऱ्यांचेही मनापासुन आभार. आभार ह्या तीनाक्षरी जादू खरंच वाखावण्याजोगी आहे.

(लेख क्र.५४५)

**- सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## आयुर्वेदीय बालसंस्कार

### अपुऱ्या दिवसांचे व कमी वजनाचे बाळ

रोज फक्त कोमट पाण्याने बाळाचे शरीर पुसून काढावे. या वेळी बाळाचे क्लीन्झिंग लोशनही वापरता येते. अनेकजणांचा बाळांना रोज अंघोळ घालण्याचा अट्टहास असतो, परंतु या बाळांना उबदार वातावरणाची गरज असते व अंघोळ घातल्याने त्यांना लगेचच थंडी वाजते. म्हणून शक्यतो अंघोळ घालणे टाळावे. बाळ अडीच किलोंचे झाल्यावर त्याला हळुवारपणे अंघोळ घालावी. अंघोळ घातल्यानंतर लगेचच त्याला उबदार कपड्यांमध्ये स्वच्छ पुसून गुंडाळावे. अंघोळीच्या वेळी बाळाच्या नाका-तोंडात पाणी जाणार नाही, याची काळजी घ्यावी. बाळाचा बिछाना हा सहसा सुती असावा. ब्लँकेट्स किंवा रजई यामध्ये धूळ अडकण्याची शक्यता जास्त असते. म्हणून शक्यतो सुती चादर किंवा शाल वापरावी. ते पटकन धुता येतात.

बाळ सारखे रडत असेल तर. किमान . बाळ दूध नीट पीत नसेल तर. बाळाला ताप आला असेल तर. श्वासोच्छ्वास घ्यायला त्याला त्रास होत असेल तर.. बाळाची त्वचा, हात व ओठ काळेनिळे पडले असतील तर. बाळाला लघवी किंवा शौच होण्यास त्रास होत असेल, तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. साधारणतः प्रसूतीची जी मूळची तारीख असते, अंदाजे तेवढ्या दिवसांचे बाळ वाढल्यानंतर बाळ अंगावर स्तनपान घेण्यास सुरुवात करते. पण तोपर्यंत अंगावरचे दूध टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. दूध ओढण्यासाठी बाळाच्या गालांमध्ये व गिळण्यासाठी घशामध्ये ताकद निर्माण झाली, की बाळ स्तनपान घेण्यास सुरुवात करते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# घराच्या बागेची रचना : सौंदर्य आणि उपयोगिता

बाग ही फक्त शोभेची जागा नसून, ती **घराचा महत्त्वाचा भाग** आहे. घरात असलेली बाग ही शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. बागेमुळे घरात सकारात्मक ऊर्जा टिकून राहते आणि नैसर्गिक सौंदर्याची अनुभूती मिळते. शहरीकरण वाढत असताना आणि जागेची कमतरता भासत असताना, लहान किंवा मोठ्या प्रमाणात **घरगुती बागेची संकल्पना लोकप्रिय होत आहे.**

**सुंदर आणि उपयुक्त बागेचे महत्त्व**

घर ही केवळ चार भिंतींची वास्तू नसून तो एक जिवंत अनुभव असतो. आपल्या घराला निसर्गाचा स्पर्श मिळवून देण्यासाठी बागेचे नियोजन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. घरातील बाग केवळ सौंदर्य वाढवण्यासाठी नसून ती मानसिक शांतता, आरोग्य, पर्यावरणीय संतुलन आणि जीवनशैली सुधारण्यासाठी उपयुक्त ठरते.

सुंदर आणि व्यवस्थित डिझाईन केलेली बाग घराला आल्हाददायक रूप देते आणि ताजेतवाने वातावरण निर्माण करते. झाडे आणि वनस्पतींमुळे घराभोवती ताज्या हवेचा प्रवाह राहतो, तापमान नियंत्रित होते आणि प्रदूषणही काही प्रमाणात कमी होते. तसेच, बागेतील हिरवळ डोळ्यांना आराम देणारी आणि मनाला शांतता देणारी असते.

**घरगुती बागेचे प्रकार :**

घरगुती बागा विविध स्वरूपाच्या असू शकतात

**✻ अंगण बाग (Courtyard Garden) :**

**वैशिष्ट्ये:**

✻ ही बाग **घराच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ किंवा अंगणाच्या मध्यभागी** असते. पारंपरिक वाड्यांमध्ये मोठ्या अंगणबागांना विशेष महत्त्व असते.

✻ झाडांच्या सावलीत बसण्याची सोय करता येते.

✻ निसर्गाचा अनुभव देणारी आणि सौंदर्यवृद्धी करणारी ही बाग असते.

**योग्य झाडे :**

✻ **फुलझाडे :** मोगरा, जाई, जुई, गुलाब, चाफा, शेवंती

✻ **फळझाडे :** आंबा, नारळ, चिकू, लिंबू, सीताफळ

✻ **सावली देणारी झाडे :** वड, पिंपळ, कडुलिंब, बकुळ

✻ **औषधी वनस्पती :** तुळस, गवती चहा, आंबेहळद, कोरफड

**विशेष टिप्स:**

✻ अंगणाच्या मधोमध **तुळशी वृंदावन** ठेवल्यास धार्मिक आणि पर्यावरणीय फायदाही मिळतो. झाडांच्या मुळांना पुरेशी मोकळा जागा मिळेल याची काळजी घ्यावी.

**गच्ची बाग** (Terrace Garden) :

**वैशिष्ट्ये :**

✻ **मोकळी जागा नसल्यास टेरेस किंवा गच्चीवर** तयार केली जाते.

✻ लहान जागेतही हिरवळ निर्माण करता येते.

✻ हलकी आणि मजबूत कुंड्या वापरून बाग तयार करता येते.

✻ उन्हाळ्यात घर थंड ठेवण्यास मदत होते.

**योग्य झाडे :**

✻ **फुलझाडे :** जास्वंद, गुलाब, शेवंती, बेला

✻ **भाजीपाला** : टोमॅटो, मिरची, कोथिंबीर, मेथी, पालक

✻ **फळझाडे (ड्वार्फ / बोन्साय प्रकार) :** डाळिंब, सीताफळ, अंजीर, केळी









✻ **औषधी वनस्पती :** तुळस, गवती चहा, ब्राह्मी, दालचिनी

**विशेष टिप्स** :

✻ पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होईल याची खबरदारी घ्यावी.

✻ मातीपेक्षा कोकोपीट आणि सेंद्रिय खत अधिक वापरल्यास झाडांची वाढ चांगली होते.

✻ **सावली निर्माण करणारी नेट किंवा ग्रीन शेड** लावल्यास उन्हामुळे झाडे करपू नयेत.

**वैशिष्ट्ये :**

**भिंतीवरील बाग** (Vertical Garden) **:**

भिंतींवर, गॅलरीमध्ये किंवा कंपाउंड वॉलवर तयार केली जाते. जागा कमी असल्यास हा उत्तम पर्याय असतो.

कमी माती आणि हलकी वाढणारी झाडे यासाठी योग्य असतात. सौंदर्यवर्धनाबरोबरच हवेची गुणवत्ता सुधारते.

**योग्य झाडे :**

✻ **फुलझाडे :** जास्वंद, अपराजिता, मनी प्लांट, बोगनवेल

✻ **हँगिंग प्लांट्स :** स्पायडर प्लांट, फर्न, पोथोस, फिलोडेंड्रॉन सुगंधी झाडे : मोगरा, तुळस, रानजाई

✻ **औषधी वनस्पती** : ब्राह्मी, पुदिना, कोरफड

**विशेष टिप्स** :

✻ झाडे लावण्यासाठी **फ्रेम, गटर पाईप, प्लॅस्टिक बॉटल्स किंवा ग्रीन वॉल पॅनेल** वापरता येतात.

✻ ठिबक सिंचन किंवा स्प्रे इरिगेशन वापरल्यास झाडांना नियमित पाणी मिळते.

✻ **कुंड्यांची बाग** (Container Garden) **:**

**वैशिष्ट्ये :**

✻ ही बाग **लहान जागेत हलवता येईल अशा कुंड्यांमध्ये** तयार केली जाते.

✻ आंगण, बाल्कनी, गॅलरी किंवा गच्चीवरही सहज बसवता येते.

✻ जमिनीत झाडे लावणे शक्य नसल्यास हा उत्तम पर्याय असतो.

✻ कमी मेहनतीत सुंदर आणि व्यवस्थित बाग तयार करता येते.

**योग्य झाडे :**

✻ **फुलझाडे :** गुलाब, शेवंती, झेंडू, जास्वंद

✻ **भाजीपाला** : टोमॅटो, वांगी, मिरची, भेंडी, गाजर

✻ **फळझाडे :** डाळिंब, सीताफळ, अंजीर, ड्रॅगन फ्रूट

✻ **सुगंधी व औषधी झाडे :** तुळस, पुदिना, गवती चहा, कोरफड

**विशेष टिप्स** :

✻ मोठ्या झाडांसाठी **मातीसह खत आणि हलका गवताचा थर** टाकल्यास झाडे चांगली वाढतात.

✻ **सिंचनाची सोय नियमित ठेवावी,** कारण कुंड्यांमधील माती लवकर कोरडी होते.

**औषधी वनस्पतींची बाग (Herbal Garden) :**

**वैशिष्ट्ये:**

✻ ही बाग **आरोग्यासाठी उपयुक्त औषधी वनस्पतींचा समावेश असलेली बाग असते.**

✻ कमी देखभालीत चांगली वाढणारी झाडे यात समाविष्ट केली जातात.

✻ ही झाडे नैसर्गिक उपचारासाठी आणि घरगुती उपयोगासाठी उपयुक्त असतात.

**योग्य झाडे :**

✻ **तुळस :** प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी उपयुक्त.

✻ **गवती चहा :** चहा व आयुर्वेदिक औषधांमध्ये उपयोगी.

✻ **कोरफड :** त्वचेसाठी आणि आरोग्यासाठी लाभदायक.

**आंबेहळद :** दुधात घालून पिण्यासाठी उपयुक्त. सदाफुली: मधुमेह नियंत्रणासाठी फायदेशीर.

**विशेष टिप्स :**

**कुंड्यांमध्ये किंवा अंगणात थेट जमिनीत लावणे उत्तम.**

नैसर्गिक खतांचा वापर करावा.

**घरात बागेची गरज आणि महत्त्व :**

**१. शुद्ध हवा :** झाडे ऑक्सिजन तयार करतात आणि प्रदूषण नियंत्रित करतात.

**२. मानसिक आरोग्य :** हिरवळ मनाला शांतता देते आणि ताणतणाव कमी करण्यास मदत करते.

**३. अन्न उत्पादन** : घरच्या घरी फळे, भाजीपाला आणि औषधी वनस्पती उगवता येतात.

**४. सजावट आणि आनंद :** सुंदर फुलझाडे आणि हरित क्षेत्रामुळे घर अधिक आकर्षक दिसते.

**कोविड-१९ नंतर वाढलेली बागेची जाणीव :**

कोविड-१९ महामारीनंतर लोकांना नैसर्गिक पर्यावरणाचे महत्त्व अधिक जाणवले. लॉकडाऊनच्या काळात घराच्या अंगणात किंवा टेरेसवर बाग तयार करण्याकडे लोकांचा कल वाढला. ताजी हवा, घरगुती भाज्या आणि तणावमुक्त वातावरण यामुळे बागेची गरज आणखी स्पष्ट झाली. त्यामुळे सेंद्रिय शेती, गच्ची बाग आणि शाश्वत लँडस्केप डिझाइन यांसारख्या संकल्पनांना भरभरून प्रतिसाद मिळत आहे.

**१. जागेचे योग्य नियोजन – लहान आणि मोठ्या जागेचा सुयोग्य वापर**

बाग डिझाईन करताना सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे उपलब्ध जागेचा योग्य वापर. जागेच्या आकारानुसार आणि घराच्या संकल्पनेनुसार बागेचे नियोजन करावे लागते.

✻ **लहान जागेतील बाग** (Small Space Gardens) :

✻ जर जागा मर्यादित असेल, तर वॉल गार्डन किंवा व्हर्टिकल गार्डन उत्तम पर्याय ठरतो.

✻ हँगिंग प्लांट्स, बाल्कनी गार्डन आणि छोट्या कुंड्यांमधील रोपटी घराला सुंदर रूप देतात.

✻ टेरेस गार्डन हे कमी जागेत बाग फुलवण्यासाठी उत्कृष्ट पर्याय आहे.

**मोठ्या जागेतील बाग** (Large Space Gardens) :

✻ मोठ्या बागेत गवताचा हिरवागार गालिचा (लॉन), फुलझाडे, फळझाडे आणि औषधी वनस्पती सहज लावता येतात.

✻ चालण्यासाठी सुबक दगडी मार्ग (वॉकवे) तयार करता येतो.

✻ विश्रांतीसाठी गॅझेबो, झोपाळे आणि बैठकीसाठी जागा नियोजन करून बागेचे सौंदर्य वाढवता येते.

**२. झाडांची निवड – योग्य वनस्पती कशा निवडाव्या?**

बागेत लावण्यासाठी झाडे निवडताना त्यांचा उपयोग, हवामान आणि मातीचा प्रकार लक्षात घेणे आवश्यक असते. खालीलप्रमाणे वेगवेगळ्या प्रकारची झाडे लावून बाग अधिक उपयोगी आणि आकर्षक बनवता येते.

**फुलझाडे** (Flowering Plants) :

✻ गुलाब, मोगरा, जाई, जुई, चाफा यांसारखी झाडे बागेत सुगंध आणि रंगत आणतात.

✻ पावसाळ्यात तग धरणारी शेवंती, गुलबक्षी यांसारखी झाडे देखील चांगला पर्याय ठरतात.

**फळझाडे** (Fruit Plants) :

✻ घराच्या बागेत लहान फळझाडे लावल्यास त्याचा सौंदर्याव्यतिरिक्त उपयोगही होतो.

✻ पेरू, चिकू, लिंबू, संत्रा आणि आंबा यासारखी झाडे लावल्यास घरगुती फळांचा आनंद घेता येतो.

**औषधी वनस्पती** (Medicinal Plants) :

✻ तुळस, गवती चहा, कोरफड, आंबेहळद, सदाफुली ही झाडे घरगुती उपयोगासाठी तसेच आरोग्यासाठी फायदेशीर असतात.

**सावली देणारी झाडे** (Shade - Giving Trees):

✻ मोठ्या जागेत वड, पिंपळ, कडुलिंब यांसारखी झाडे लावल्यास सावली मिळते आणि पर्यावरण सुधारते.

**३. बागेची निगा – देखभाल आणि व्यवस्थापन**

सुंदर आणि टिकाऊ बागेसाठी नियमित देखभाल करणे आवश्यक आहे. झाडांना वेळेवर पाणी देणे, योग्य प्रमाणात खत टाकणे आणि छाटणी करणे यामुळे बाग चिरतरुण राहते.

**पाणी व्यवस्थापन** : झाडांना योग्य प्रमाणात पाणी देणे महत्त्वाचे आहे. ठिबक सिंचन प्रणालीचा

(Drip Irrigation) वापर केल्यास पाणी वाचते आणि झाडांना योग्य प्रमाणात ओलावा मिळतो.

**खत व्यवस्थापन** : नैसर्गिक कंपोस्ट खताचा (Organic Compost) वापर केल्यास माती सुपीक राहते आणि झाडे निरोगी वाढतात. रासायनिक खतांचा अतिरेक टाळावा.

**कीड व रोग नियंत्रण :** बागेतील झाडांना कीड व रोग होऊ नयेत म्हणून सेंद्रिय उपाय वापरणे योग्य असते. गंधकयुक्त नैसर्गिक औषधे फवारल्यास झाडांचे संरक्षण होते.

**४. बागेत विविध घटकांचा समावेश – सौंदर्यात भर घालणारे घटक**

केवळ झाडे लावून बाग सुंदर दिसत नाही, तर तिच्यात काही अतिरिक्त घटकांचा समावेश केल्यास ती अधिक आकर्षक आणि उपयोगी ठरते.

**तळे किंवा फवारा** (Water Features) : घराच्या बागेत छोट्या तळ्याचा किंवा फवाऱ्याचा समावेश केल्यास निसर्गाची सुंदरता वाढते.

**बागेतील दिवे** (Garden Lighting) : सौर दिवे किंवा मऊ प्रकाश असलेले दिवे बसविल्यास रात्री बाग अधिक मोहक दिसते.

**बसण्याची व्यवस्था** (Seating Areas) : लाकडी किंवा दगडी बाके, झोपाळे आणि गॅझेबो यामुळे बागेतील सौंदर्य अधिक खुलते.

**पक्ष्यांसाठी निवास** (Bird Feeders Nesting Areas) : बागेत पक्ष्यांसाठी पाणी आणि अन्न ठेवण्यासाठी जागा ठेवल्यास निसर्ग अधिक जिवंत वाटतो.

**५. पर्यावरणपूरक बाग – हरित जीवनशैलीचा अवलंब**

पर्यावरणस्नेही बाग तयार करताना **सेंद्रिय शेती, पुनर्वापरयोग्य साहित्याचा वापर,** आणि **पाणी संवर्धन तंत्रे** वापरणे महत्त्वाचे आहे. सेंद्रिय पद्धतीने झाडांची निगा घेतल्यास प्रदूषण टाळता येते आणि पर्यावरण संतुलन राखले जाते.

घरगुती बाग केवळ सौंदर्यासाठी नाही तर आरोग्य, मानसिक समाधान, पर्यावरण सुधारणा आणि स्वच्छ हवेचा स्रोत आहे. योग्य नियोजन, वनस्पतींची निवड आणि देखभाल केल्यास घराच्या बागेचे सौंदर्य आणि उपयोगिता अधिक वाढते. निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याचा हा सर्वोत्तम मार्ग आहे.

**लेखक : आर्कि. मानव राजेंद्र निमसे**
(M. Arch. Landscape)
Mob. no.- ८७८८५९५४६१
**पत्ता- बी. ५. साईकुंज अपार्टमेंट, गुलमोहर रोड, सावेडी, अ.नगर ४१४००३.**
Email- Ar.manavnimse@gmail.com



आर्किटेक्टस, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर
www.aesanagar.com
AESA

## ऑलिम्पियाड परिक्षेत रिदाफातिमा शेखचे यश



नगर – सन २०२५ या सालात घेण्यात आलेल्या ऑलिम्पियाड स्पर्धा परिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या परिक्षेमध्ये अशोकभाऊ फिरोदिया हायस्कूलमध्ये इ.५ वी मध्ये शिकत असलेली रिदाफातिमा शेख ही दुसऱ्या रँकमध्ये उत्तीर्ण झाल्याबद्दल तिला सुवर्ण पदकाने सन्मानित करण्यात आले आहे. सुवर्ण पदक व प्रशस्तीपत्र अशोकभाऊ फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. भांबळ यांच्या हस्ते तिला देण्यात आले. रिदाफातिमा ही डॉ.मुबीन शेख यांची मुलगी आहे.

## विदर्भ मित्र मंडळाच्या केडगाच्या सांस्कृतिक भवनात गजानन महाराज मूर्तीची प्राणप्रतिष्ठा











केडगावमध्ये विदर्भ मित्र मंडळाच्या नूतन सांस्कृतिक भवनात गजानन महाराज मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

नगर – नगरमध्ये स्थायिक असलेल्या विदर्भवासियांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या विदर्भ मित्र मंडळाच्या केडगाव लिंक रोड साईनगर येथील नूतन सांस्कृतिक भवनात श्री गजानन महाराज यांच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा १० एप्रिल रोजी उत्साहात पार पडला. श्री रामकृष्ट ट्रस्टचे पदाधिकारी मोहनलाल मानधना, निळकंठ देशमुख (सराफ) यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, सदस्य तसेच केडगावकर भाविकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

सकाळी ८ वाजता या सोहळ्यास प्रारंभ झाला सुरुवातीला वास्तुशांती पूजा व नंतर श्री गजानन महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. हे सर्व कार्यक्रम विधिवत करण्यात आले. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन केले होते. या सोहळ्यास उपस्थित असलेल्या सर्व भाविकांचे मंडळाचे अध्यक्ष डॉ.एस.बी.कोलते यांनी स्वागत केले. तसेच सर्व देणगीदारांना धन्यवाद दिले. यानंतर सांस्कृतिक भवन निर्माण करण्यासाठी योगदान देणारे प्रमुख देणगीदार किरण कथडे, डॉ. नरेंद्र वानखडे, श्रीमती मंदाकिनी किलोर, श्रीमती सिंधुताई देशमुख, श्री व सौ. अनिल साळवे, साकेत सपकाळ यांचा सत्कार करण्यात आला. या सोहळ्यासाठी विदर्भ मित्र मंडळाचे सर्व सभासद विशेष करून अध्यक्ष डॉ. शरद कोलते, उपाध्यक्ष डॉ. नरेंद्र वानखडे, सचिव आनंद किलोर, धकाते, इंगळे, कुंभारे, सराफ, विजयकर, उमक, तांदूळकर, राजू धुमणे, सचिन गोळे, वडाळकर, शंकरराव धूमणे, देऊळकर, सागर वानखडे, अनिल साळवे, भस्मे, डेंगेकर, दीपक धनभर आदींनी परिश्रम घेतले.

डॉ.कोलते म्हणाले, विदर्भ मित्र मंडळाची स्थापना एप्रिल १९९७ मध्ये करण्यात आली. सुरुवातीला मंडळाची सभासद संख्या कमी होती त्यानंतर सभासद संख्या वाढली तसेच मंडळाचा आकार सुद्धा वाढला. कार्यक्रमाची संख्या वाढली. मंडळातर्फे विविध सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. रक्तदान शिबिर, गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ, वृक्षारोपण आदी उपक्रम राबविण्यात येतात. मंडळाची एक हक्काची वास्तू असावी अशी सर्व सभासदांची इच्छा असल्याने २०१२ मध्ये मंडळांनी स्वतःची जागा घेतली. २०२३ मध्ये या जागेवर का सांस्कृतिक भवन निर्माण करण्यासाठी बांधकाम सुरू करण्यात आले. आज या जागी अतिशय दिमाखदार सांस्कृतिक भवन व श्री गजानन महाराजांचे मंदिर साकारले आहे. आजमितीस मंडळाची सभासद संख्या २६० एवढी झाली आहे. सांस्कृतिक भवनात सार्वजनिक वाचनालय व निशुल्क चिकित्सालय सुरु करण्यात येणार असल्याचे डॉ.कोलते यांनी सांगितले.

## ‘मी सावित्रीबाई ज्योतिराव फुले’ १३ एप्रिलला एकपात्री नाट्य प्रयोग



नगर – सरकारी शाळा वाचवा आणि मोफत शिक्षण न्याय व हक्क परिषद अभियान अहिल्यानगर यांच्यावतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती औचित्य साधून १३ एप्रिल रोजी सायंकाळी ५.३० वाजता माऊली सभागृह, झोपडी कॅन्टीन जवळ, अहिल्यानगर येथे महाराष्ट्र महाराष्ट्र बाहेर गाजलेले ’मी सावित्री ज्योतिराव फुले’ एकपात्री नाट्य प्रयोग आयोजित करण्यात आल्याची माहिती सरकारी शाळा वाचवा आणि मोफत शिक्षण न्याय व हक्क परिषदेचे मुख्य संयोजक सुदाम लगड यांनी दिली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रेहमत सुलतान फौंडेशन अहिल्यानगरचे अध्यक्ष युनूसभाई तांबटकर हे असणार आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटन विनयकराजं फौंडेशनचे अध्यक्ष उद्योजक विपुल वाखरे पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती भिंगार अर्बन को ऑफ बँकचे संचालक महेश झोडगे, सातारा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, मार्कंडेय विद्यालयाचे माजी प्राचार्य रावसाहेब क्षेत्रे यांचे प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या एकपात्री नाट्यप्रयोगास उपस्थित राहण्याचे आवाहन सरकारी शाळा वाचवा आणि मोफत शिक्षण न्याय व हक्क परिषद अभियान अहिल्यानगर यांच्यावतीने करण्यात आले.

## आठरे पाटील पब्लिक स्कूलमध्ये ११वी च्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश परीक्षा

नगर – सावेडी विभागातील वडगांव गुप्ता रोड येथील आठरे पाटील पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळेत आगामी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग सुरु करण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी विज्ञान व वाणिज्य (इंग्रजी माध्यम) या दोन्ही शाखेत प्रवेश देण्यात येणार आहेत.

महाराष्ट्रातील एकमेव शाळा आहे की, ज्या शाळेचा गत ३८ वर्षांपासून एस.एस.सी. बोर्ड परीक्षेच्या प्रतिवर्षी १००% निकालाची उत्कृष्ट परंपरा आहे. प्रतिवर्षी एस.एस. सी. बोर्ड परीक्षेत ८५% पेक्षा अधिक विद्यार्थी विशेष व प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होतात.

अद्ययावत भौतिक सुविधा, शालेय गुणवत्ता व शिस्त या त्रिसूत्रीचा वापर करुन उच्च विद्याविभूषित शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास या नामांकित शाळेत घडविला जातो. शाळेचा शांत, प्रशस्त व निसर्गरम्य परिसर असून सी. सी. टी. व्ही. निगराणी खाली आहे.

कुशल, अनुभवी क्रीडा प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली जलतरण व अश्वरोहण या क्रीडा प्रकारांसहित २५ देशी-विदेशी क्रीडा प्रकारांची सुविधा उपलब्ध आहे. इंग्रजी भाषा प्रयोगशाळेबरोबरच इंटरनेट व वायफायसह ६५ लॅपटॉपसह सुसज्जित संगणक प्रयोगशाळा, जर्मन भाषा प्रशिक्षण उपलब्ध आहे.

रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र व जीवशास्त्र या शास्त्र विषयांसाठी सुसज्ज प्रयोगशाळा असून निवासी मुला- मुलींसाठी स्वतंत्र व आधुनिक सुविधांसह सुसज्ज अशा शालेय वसतिगृहाची सुविधा उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना अवांतर वाचनासाठी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषा विषयांची १०००० च्यावर क्रमिक व संदर्भ पुस्तके शालेय ग्रंथालयात उपलब्ध आहेत. प्रत्येक शाखेच्या वर्गात मर्यादित विद्यार्थी संख्या राहील. विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देऊन, त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अधिक प्रयत्न केले जातील.

इ. ११ वी शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या आवडीप्रमाणे मेडिकल कॉलेज प्रवेशासाठी आवश्यक NEET आणि इंजिनियरिंगच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेला JEE या स्पर्धा परीक्षांची तसेच MHCET परीक्षेद्वारे होणाऱ्या शास्त्र शाखेच्या इतर प्रवेशासाठीची स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेतली जाईल त्याचप्रमाणे Maharashtra State Board च्या अभ्यासक्रमांबरोबर NCERT चा अभ्यासक्रम शिकविण्याची व्यवस्था केली जाईल. तसेच PCM, PCMB आणि PCB Group साठी व National Defence Academy (NDA) परीक्षेसाठी स्वतंत्रपणे विशेष मार्गदर्शन केले जाईल.

इ. ११ वी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी काळाची गरज ओळखून इंग्रजी माध्यम ातून शिक्षण देण्याची व्यवस्था केलेली आहे. तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे Company Secretary (CS) आणि C.A. Foundation च्या विशेष मार्गदर्शनाची व्यवस्था केलेली आहे.

सन २०२५-२६ या आगामी शैक्षणिक वर्षात शाळेत कनिष्ठ महाविद्यालयाचे इयत्ता अकरावीच्या विज्ञान व वाणिज्य या दोन्ही शाखांचे नवीन इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरु होत आहेत, या वर्गासाठी १३/०४/२०२५ रोजी सकाळी ८ वाजता इयत्ता अकरावी प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहेत. तसेच शाळेच्या (आठरे पाटील पब्लिक स्कूल) इयत्ता दहावीच्या उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश परीक्षा देण्याची आवश्यकता नाही. त्यांची केवळ पालकांसमवेत तोंडी मुलाखत घेतली जाईल. तरी इयत्ता अकरावीच्या वर्गात प्रवेश घेणाऱ्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षेसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन चंद्रभान आठरे पाटील ग्राम नवोदय ट्रस्ट, अहमदनगर या संस्थेचे अध्यक्षा डॉ. अंजली आठरे पाटील, कार्यकारी विश्वस्त डॉ. अनिल आठरे पाटील व प्राचार्य कर्नल जोशी शेखर यांनी केले आहे.



अरुण जगताप यांच्या प्रकृती स्वास्थासाठी सर्वधर्मियांनी निर्मलनगरला भगवान बाबा मंदिरात महाआरती, प्रार्थना करण्यात आली. (छाया – लहू दळवी)

# माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृती स्वास्थासाठी सर्वधर्मियांनी परमेश्वराकडे केलेली प्रार्थना सार्थक होईल

## भीमराज आव्हाड यांचा विश्वास; निर्मलनगरला भगवान बाबा मंदिरात महाआरती, प्रार्थना

नगर – अरुण जगताप यांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत असून, अहिल्यानगरमधील सर्व समाजाच्या वतीने मंदिरे, चर्च, गुरुद्वारा, मशिदमध्ये त्यांना पूर्णपणे बरे वाटावे, दीर्घायुष्य लाभावे, यासाठी महाआरती, प्रार्थना, नामजप होत आहेत. सर्वधर्मियांनी अरुण काकांसाठी परमेश्वराकडे केलेली प्रार्थना सार्थक होईल, असा ठाम विश्वास भगवान बाबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष भीमराज आव्हाड यांनी व्यक्त केला.

सावेडी उपनगरात निर्मलनगरला सर्व समाजबांधव, नागरिकांच्या वतीने अरुण काकांना लवकर बरे वाटावे व त्यांची प्रकृती चांगली होऊन त्यांना आयुष्य वाढावे, यासाठी भगवान बाबांच्या मंदिरात महाआरती होऊन प्रार्थना करण्यात आली. याप्रसंगी भीमराज आव्हाड, राहुल सांगळे, ऋतिक काळे, गौरव चव्हाण, आदेश कर्डिले, निलेश चव्हाण, ज्ञानेश्वर गाडे, राजू केरूळकर, जालिंदर पालवे, जगन्नाथ जावळे, नामदेव कांबळे, भास्कर पांडुळे, गणेश बांगर राजेंद्र बडे, संजय सानप, रवी पडघम, आनंद नाकाडे, किशोर खांडरे सिताराम पालवे, ताराताई घुले, चंद्रकला जावळे, वैशाली आव्हाड, सुमन डोंगरे, अलका आव्हाड, शोभा आव्हाड, साधना लोखंडे, लता पालवे आदींसह नागरिक उपस्थित होते.

श्री.आव्हाड म्हणाले की, अरुण काका नगरचे नगराध्यक्ष असताना शहरासाठी कामे करताना राजकारणापेक्षा समाजकारण केले, अनेक मित्र त्यांनी जोडले. सर्वधर्मसमभाव वृत्तीने सर्व समाजासाठी त्यांनी कामे केली, त्यामुळे आज त्यांच्या प्रकृती स्वास्थ्यासाठी सर्व समाजाची माणसे एकत्र येऊन प्रार्थना करतात, अशी माणसे त्यांनी कमावली. त्यांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत असून, आपल्या सर्वांची प्रार्थना परमेश्वर नक्की ऐकणार, लवकरच ते पूर्ण बरे होतील, असा विश्वास भीमराज आव्हाड यांनी व्यक्त केला.

# महावीर चषक परिवार व सकल जैन समाज बांधवांतर्फे अरुणकाका जगताप यांच्यासाठी आनंदधाम येथे प्रार्थना



अरुण जगताप यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी यासाठी महावीर चषक परिवार व सकल जैन समाज बांधवांतर्फे आनंदधाम येथे प्रार्थना करण्यात आली. (छाया – लहू दळवी)

नगर – पुणे येथे माजी आमदार अरुण जगताप यांच्यावर सध्या वैद्यकीय उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती लवकरात लवकर सुधारावी, यासाठी आनंदधाम येथे प्रार्थना सभा आयोजित करण्यात आली. आनंदऋषीजी महाराज यांच्या समाधीस्थळावर सकल जैन समाज बांधवांच्या वतीने ही प्रार्थना करण्यात आली. यावेळी जैन बांधव उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येऊन अरुण जगताप यांना बळ मिळावे, यासाठी मनोभावे साकडे घातले. जगताप कुटुंबियांच्या आरोग्यासाठी आणि अरुणकाका लवकरात लवकर पूर्ण बरे होण्यासाठी समाजातून सदिच्छा व्यक्त होत आहेत.

अरुण जगताप यांची प्रकृती अचानकपणे बिघडली असून, त्यांच्यावर पुणे येथे खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. त्यांच्याबद्दल समाजामध्ये असलेले ऋणानुबंध व प्रेम भावना पाहता ते समाजाच्या हितासाठी काम करत असतात. यासाठी त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा होऊन ते पुन्हा आपल्या माणसांमध्ये यावे, यासाठी आनंदधाम येथे महावीर चषक परिवार आणि सकल जैन बांधवांच्या वतीने मनोभावे प्रार्थना करण्यात आली असल्याची माहिती माजी नगरसेवक संजय चोपडा यांनी केली.

अरुण जगताप यांना समाजाबाबत संवेदना आहे. ते नेहमीच चांगल्या कामासाठी समाजाला पाठिंबा देऊन ते काम पूर्ण करून घेण्यासाठी पुढाकार घेत असतात, ही बाब कौतुकास्पद असते. त्यासाठी त्यांची प्रकृती लवकर बरी होऊन ते चांगले काम करण्यासाठी समाजामध्ये लवकर यावे, यासाठी मनोभावे प्रार्थना करण्यात आली असल्याचे मत अलोकऋषीजी महाराज यांनी व्यक्त केले.





सभापती राम शिंदे, व आ. सुरेश धस यांच्याकडून अरुण जगताप यांच्या तब्येतीची विचारपूस करण्यात आली.

# राम शिंदे, छगन भुजबळ व आ. सुरेश धस यांच्याकडून माजी आमदार अरुण जगताप यांच्या तब्येतीची विचारपूस

नगर – अरुण जगताप यांच्यावर पुण्याच्या खाजगी रुग्णालयात उपचार चालू आहेत. शुक्रवारी विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, माजी मंत्री छगन भुजबळ व आमदार सुरेश धस यांनी हॉस्पिटलमध्ये जाऊन अरुण जगताप यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच आमदार संग्राम जगताप व सचिन जगताप यांच्याशीही आस्थेने चर्चा करून त्यांना धीर दिला.

यावेळी अरुण जगताप यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांशीही संवाद साधून सुरु उपचारांची माहिती घेतली व सूचना केल्या.

यावेळी सभापती राम शिंदे म्हणाले, अरुण जगताप प्रकृतीत सुधारणा होत असून, ते उपचारांना प्रतिसादही देत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. मात्र अहिल्यानगर मधील नागरिकांनी पुण्यात येऊन हॉस्पिटलमध्ये गर्दी करण्यापेक्षा नगरमध्येच राहून अरुण जगताप यांच्या स्वास्थ्यसाठी परमेश्वराला प्रार्थना करावी, असे आवाहन केले आहे.

# अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी यासाठी केडगाव ग्रामस्थांतर्फे जगदंबा मातेच्या मंदिरात महाआरती

नगर – अरुण जगताप यांच्यावर पुणे येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून, त्यांच्या प्रकृती लवकरात लवकर सुधारणा व्हावी, यासाठी केडगाव ग्रामस्थांच्यावतीने केडगाव देवी जगदंबा मातेला साकडे घालत महाआरती केली.

यावेळी माजी सभापती मनोज कोतकर, माजी नगरसेवक सुनील कोतकर, सुनील मामा कोतकर, जालिंदर कोतकर, बाळासाहेब पठारे, संजय लोंढे, महेश गुंड, पोपट कराळे, बच्चन कोतकर, संभाजी सातपुते, शरद ठुबे, रघु ठुबे, श्याम कोतकर, पिनू ढवळे, अप्पा मतकर, अण्णा शिंदे, पिंटू मोढवे, उमेश सुबे, प्रसाद अंधळे, रूपेश गायकवाड, सोपान कोतकर, सोनू घेंबुड, सतीश खैरे, युवराज कोतकर, रामदास काकडे, भारत कांबळे, महेश कांबळे, अक्षय पाचारणे, सोपान कोतकर, अशोक गुंड, राजू कोतकर, उमेश क्षीरसागर, पोपट ठुबे आदी उपस्थित होते.



अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी यासाठी केडगाव ग्रामस्थांतर्फे जगदंबा मातेच्या मंदिरात महाआरती करण्यात आली. (छाया – लहू दळवी)

अरुणकाका हे सर्वांना बरोबर घेऊन चालणारे नेतृत्व असून, त्यांच्या आरोग्यावर आलेले संकट लवकर दूर व्हावे, यासाठी श्री जगदंबा मातेच्या चरणी प्रार्थना करण्यात आली असून, केडगाव देवी माता नक्कीच यश देईल. काका हे समाजाला आधार देणारे नेतृत्व असून, ते लवकर बरे होऊन नगरकरांच्या सेवेत दाखल होतील, असे मत मनोज कोतकर यांनी व्यक्त केले.

# महात्मा फुले व डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त व अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी बाल सुधारगृहात अन्नदान व प्रार्थना

नगर – महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त व अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी रिपब्लिकन सेनेच्या वतीने नालेगाव येथील बालसुधारगृहात अन्नदान करून प्रार्थना करण्यात आली.

यावेळी रिपब्लिकन सेनेचे जिल्ह्याचे नेते सुनील शिंदे, राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे सुरेश बनसोडे, प्रा.जयंत गायकवाड, महेश भोसले, विकास रणदिवे, अतुल भिंगारदिवे, सुनील राऊत, योगेश घोडके, किसन करपे, गंगाराम खंडागळे, शैलेश लाटणे, महेश कांबळे, सुजित घंगाळे, मनोज साळवे, प्रकाश विधाते, संदीप आल्हाट, प्रणव पाडळे आदीसह फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीतील नेते व रिपब्लिकन सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.



महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त व अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी रिपब्लिकन सेनेच्या वतीने बाल सुधार गृहात अन्नदान करण्यात आले.

महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त इतर खर्चाला फाटा देत बाल सुधारगृहात अन्नदानाचा कार्यक्रम ठेवण्यात आला व अरुण जगताप यांच्यावर पुणे येथील खाजगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून, त्यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी, यासाठी विद्यार्थ्यांसमवेत प्रार्थना करण्यात आली. प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी सर्व जाती धर्माचे लोक मंदिर, मशिद, बुद्ध विहार, गुरुद्वारा येथे प्रार्थना करत आहे. लवकरच ते बरे होऊन परत शहरात यावे, अशी सर्वांची मनापासून इच्छा असल्याची भावना रिपब्लिकन सेनेचे सुनील शिंदे यांनी व्यक्त केली.

# संकटमोचक हनुमंता, माझ्या आजोबांना लवकर बरे कर

## छोट्या आराध्यची हनुमंताच्या चरणी प्रार्थना

नगर – माझे आजोबा अरुणकाका यांच्यावर आलेले संकट लवकरात लवकर दूर करून आजोबांना दीर्घायुष्य दे, अशी प्रार्थना छोट्या आराध्य जगताप याने संकटमोचक हनुमंताच्या चरणी केली आहे. शनिवारी हनुमान जयंतीनिमित्त आष्टी तालुक्यातील पाटण येथील समर्थ रामदास स्वामी यांनी स्थापन केलेल्या जागृत हनुमान मंदिरात पहाटे ३ वाजता आराध्य जगताप याच्या हस्ते विधिवत मंत्रोच्चारात महापूजा करून जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी आराध्यने मनोभावे हनुमंताच्या चरणी आजोबा अरुण जगताप यांना दीर्घायुष्य मिळून त्यांच्यावरील सर्व संकट दूर करण्याची प्रार्थना केली. यावेळी डॉ.विजय भंडारी, कु. परमेश्वरी जगताप, योगेश दाणी, पाटणचे सरपंच दादासाहेब जगताप, रामराव जगताप, सोमनाथ वनवे, दत्तात्रय आडकर आदींसह भाविक उपस्थित होते. यावेळी पंचक्रोशीतील शेकडो नागरिकांनीही अरुण जगताप यांना दीर्घायुष्य मिळावे, यासाठी हनुमंताच्या चरणी साकडे घातले.



अरुण जगताप यांना दीर्घायुष्य मिळण्यासाठी त्यांचा नातू आराध्य जगताप याने हनुमान जयंतीनिमित्त पाटण येथील समर्थ रामदास स्वामी यांनी स्थापन केलेल्या जागृत हनुमान मंदिरात महापूजा केली.

आष्टी तालुक्यातील पाटण येथील या हनुमान मंदिरात समर्थ रामदास स्वामी यांनी हनुमंताच्या मूर्तीची स्थापना केली आहे. या जागृत हनुमानावर जगताप कुटुंबियांची मोठी श्रद्धा आहे. अरुणकाका यांची तब्येत खालवल्याने त्यांच्यावर आलेले संकट लवकरात लवकर दूर करण्याची प्रार्थना अरुण जगताप यांचा नातू आराध्यने केली आहे.



अहमदनगर पहिली मंडळी (कॉग्री) अ.नगर, गार्डन हॉल मेमोरियल चर्च, हातमपुरा येथे माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्या दिर्घ आरोग्यासाठी प्रार्थना करण्यात आली.

# माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्या आरोग्यासाठी अहमदनगर पहिली मंडळी (कॉग्री) चर्चच्यावतीने प्रार्थना

नगर – अहमदनगर पहिली मंडळी (कॉग्री) अ.नगर, गार्डन हॉल मेमोरियल चर्च, हातमपुरा येथे माजी आमदार अरुण जगताप यांच्या दिर्घआरोग्यासाठी प्रार्थना करण्यात आली. यावेळी आचार्य रेव्ह. सनी मिसाळ, सेक्रेटरी रविंद्र ठोंबरे, विश्वस्त व्ही.एम.साळवे, एस.बी.ठोंबरे, पी.के.काळे, एस.आर.बनकर आदी उपस्थित होते.

यावेळी आचार्य रेव्ह.सनी मिसाळ म्हणाले कि, सध्या ख्रिश्चन समाजात उपासाचे दिवस सुरु असून, त्या निमित्ताने सर्वांसाठी प्रार्थना करत आहोत. अरुणकाका यांच्या दिर्घ आयुष्यासाठी विशेष प्रार्थना करण्यात आली. आमचा विश्वास आहे की, आमचे प्रभु येशु ख्रिस्त त्यांना बरे करेल, त्यांचे आरोग्य चांगल करेल. लवकरच ते पुन्हा सक्रीय होतील.

सेक्रेटरी रविंद्र ठोंबरे म्हणाले की, अरुण काका यांची तब्येत अचानकपणे बिघडली असल्यामुळे पुणे येथे खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून ते उपचाराला प्रतिसाद देत आहेत. त्यांची प्रकृती लवकर बरी व्हावी, आमच्या चर्चच्या वतीने आम्ही प्रभु येशुकडे साकडे घालत आहोत.

यावेळी ख्रिश्चन समाज बांधव उपस्थित होते. सर्वांनी काकांसाठी प्रार्थना केली.

# अरुण जगताप यांच्या प्रकृती स्वास्थ्यासाठी ब्राह्मण समाजातर्फे सामूहिक प्रार्थना व आरती

नगर – अरुण जगताप यांच्या तब्येतीत चांगल्या प्रकारची सुधारणा व्हावी व त्यांना चांगले आरोग्य, दिर्घ आयुष्य लाभावे, यासाठी सकल ब्राह्मण समाज सेवा संस्थेच्या वतीने सावेडीतील रेणुका माता मंदिरात सामूहिक प्रार्थना व आरती करण्यात आली.



अरुण जगताप यांच्या प्रकृती स्वास्थ्यासाठी ब्राह्मण समाजातर्फे सामूहिक प्रार्थना व आरती करण्यात आली.

यावेळी सकल ब्राह्मण समाज सेवा संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ पोतदार, विजय देशपांडे, श्रिया देशमुख, अतुल शुक्ल, हेमंत जोशी, दत्तात्रय कुलकर्णी, अनिल आवटी, केतन बडवे, योगेश दानी, प्रमोद कुलकर्णी, शाम रेणावीकर, मंगेश निसळ, प्रभाताई भोंग, कालिंदी केसकर, विलास देशपांडे, संजय देशपांडे, नरेंद्र श्रोत्री, सुहास देशपांडे, एकनाथ देशपांडे, अमोल पारनाईक, एन. डी. कुलकर्णी, सविता रसाळ, शोभा ढेपे, ज्ञानेश्वर देशमुख, मिलिंद जोशी आदी ब्राह्मण समाज बंधू भगिनी उपस्थित होत्या.

अरुण जगताप हे गेल्या काही दिवसांपासून पुण्यातील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल झालेले आहेत. ते उपचाराला चांगला प्रतिसाद देत असून, त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याचे रुग्णालय प्रशासन व जगताप कुटुंबीयांच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे. तेव्हापासून शहरातील त्यांचे चाहते विविध समाज बांधव व नागरिक त्यांच्या प्रकृती स्वास्थ्यासाठी प्रार्थना करीत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सकल ब्राह्मण समाज सेवा संस्थेच्या वतीने ११ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वा. सावेडी येथील रेणुका माता मंदिरात एकत्र येऊन सामूहिक प्रार्थना व आरती करण्यात आली.

# माजी आमदार अरुण जगताप यांच्या स्वास्थ्यासाठी नालेगाव गाडगीळ पटांगण येथे अखंड हरिनाम सप्ताहात हनुमानाचा नामजप

नगर – नालेगाव गाडगीळ पटांगण येथे हनुमान जयंतीनिमित्त सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, यासाठी भाविकांनी हनुमानाचा नामजप केला. जिल्ह्याच्या राजकारणात अरुणकाकांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली असून, त्यांचे समाजहितासाठी असलेले योगदान अत्यंत मोलाचे आहे. सध्या ते प्रकृती अस्वास्थ्यामुळे उपचार घेत असून, त्यांच्या आरोग्यात लवकर सुधारणा व्हावी आणि ते जनतेच्या सेवेस पुन्हा सक्रिय व्हावेत, यासाठी श्रद्धेने प्रार्थना करण्यात आली. याप्रसंगी माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल यांच्या मार्गदर्शनाखाली नालेगाव ग्रामस्थांनी मनोभावे हरिनामाचा जप केला. या नामजपाचे आयोजन ह.भ.प. मारुती महाराज झिरपे यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. त्यांनी सांगितले की, काकांचे आरोग्य लवकर ठीक होऊन ते नगरमध्ये पुन्हा कार्यरत होतील, यासाठी सामूहिक प्रार्थना केली जात आहे, असे ते म्हणाले.


अरुण जगताप यांचे नालेगाव ग्रामस्थांशी नेहमीच स्नेहसंबंध राहिले आहेत. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी कायम पुढाकार घेतला आहे. नालेगाव येथील पावन श्री हनुमान मंदिर हे गावकऱ्यांचे श्रद्धास्थान असून, हनुमान जयंतीनिमित्त अरुणकाकांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, यासाठी नागरिकांनी श्री हनुमान नामजपाचे सामूहिक पठण केले असल्याची माहिती दत्तात्रय मुदगल यांनी दिली.



अरुण जगताप यांच्या स्वास्थ्यासाठी अखंड हरिनाम सप्ताहात हनुमानाचा नामजप करण्यात आला. (छाया – लहू दळवी



संगणकावर तासन्‌तास काम करत राहणाऱ्यांना वेळेचं भान उरत नाही. मात्र त्यांना आता ही प्रवृत्ती बदलावीच लागेल. कारण नवीन संशोधनानुसार एका जागी अशा प्रकारे केवळ एक ते दोन तास सलग बसण्याचाही आरोग्यावर अत्यंत प्रतिकूल परिणाम होत असून त्यामुळे मृत्यू ओढवण्याचा गंभीर धोकाही निर्माण होतो. या समस्येवर मात करण्यासाठी काळजी घ्यावी लागेल?



# निरामय

## मायग्रेनला कमी लेखू नका...

सर्वसामान्यपणे डोकेदुखीला आपण सहजतेने घेतो. पण नेहमी होणारी डोकेदुखी सहज घेणं महागात पडू शकते. सतत होणाऱ्या डोकेदुखीचं कारण मायग्रेन ही असू शकतं. मायग्रेन म्हणजे अर्धशिशीमध्ये डोक्याच्या एकाच बाजूला वेदना होतात. तीव्र स्वरूपाच्या या वेदना काही वेळ किंवा तीन तासापर्यंतही राहतात. तीव्र डोकेदुखीसोबत उलटी, मळमळ अशा प्रकारचा त्रासही होऊ शकतो.

**आरोग्यमंत्र**

भडक प्रकाश किंवा गोंगाटानेही अर्धशिशीच्या रुग्णाला त्रास होण्याची शक्यता असते. मायग्रेनच्या सततच्या त्रासाने ब्रेन हॅमरेज किंवा पॅरेलिसिसचा त्रास होण्याची शक्यता असते.

हाय ब्लडप्रेशर असलेल्या व्यक्तींना मायग्रेनचा त्रास होण्याची शक्यता जास्त असते. तुम्ही जर तुमच्या भावना दाबून ठेवत असाल तर तुम्हाला मायग्रेनचा त्रास होण्याची शक्यता जास्त प्रमाणात असते. मायग्रेन हा आजार अनुवांशिकही असतो. स्त्रियांमध्ये हार्मोनल असंतुलन मायग्रेनचं कारण बनू शकतं. मायग्रेनचा त्रास होत असल्यास थंड पाण्याची पट्टी डोक्यावर ठेवा. असं केल्याने धमन्या प्रसरण पावतात आणि डोकेदुखी कमी होण्यास मदत होते. ताण- तणाव कमी करणाऱ्या उपायांचा दैनंदिन जीवनात अवलंब केल्यास मायग्रेनपासून मुक्ती मिळायला मदत होते. जास्त वेळ उपाशी राहणं टाळा म्हणजे मायग्रेनचा त्रास होणार नाही. तुम्ही काम करत असलेल्या ठिकाणी भडक प्रकाश, गोंगाट किंवा उग्र वास यांपासून दूर रहा. तुम्ही जंक फूडचे अधिक भोक्ते असाल तर मायग्रेची तीव्रता वाढू शकते यामुळे जंक फूड किंवा पॅक्ड फूडपासून लांब रहा. पनीर, चॉकलेट, चीज, नुडल्स, केळी अशा पदार्थांपासून मायग्रेनच्या रुग्णांनी लांब राहणं योग्य असतं.

## महिलांमध्येही आढळतात हृदयविकाराची अन्य लक्षणे

गेल्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने अनेक सेलिब्रिटींचा मृत्यू झाला. प्रसिद्ध कॉमेडियन राजू श्रीवास्तव, बिग बॉस विजेता सिद्धार्थ शुक्ला यांना व्यायाम करत असताना हृदयविकाराचा झटका आला आणि रुग्णालयात त्यांचा मृत्यू झाला. अलिकडेच मिस युनिव्हर्स आणि प्रसिद्ध अभिनेत्री सुष्मिता सेनला हृदयविकाराचा झटका आला. यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले. सुष्मिता सेनच्या हृदयविकाराच्या झटक्याने महिलांमध्ये बरीच चिंता व्यक्त केली गेली.

महिलांना हृदयविकाराचा झटका टाळायचा असेल तर लक्षणांची काळजी घेणे आवश्यक आहे. अमेरिकेच्या 'क्लीव्हलँड क्लिनिक मेडिकल सेंटर'ने एक संशोधन केले. त्याबाबत संस्थेने म्हटले आहे की, हृदयविकाराच्या झटक्यामध्ये छातीत दुखण्याव्यतिरिक्त इतरही अनेक लक्षणे असतात. ही लक्षणे सहसा फक्त महिलांमध्ये दिसतात. ओटीपोटात वेदना, पोटदुखी ही सामान्यतः अन्न विषबाधा किंवा गॅसची समस्या मानली जाते; परंतु अनेक प्रकरणांमध्ये, पोटदुखी हृदयविकाराचेही संकेत देते. पोटात तीव्र वेदना होत असल्यास, पोटात किंवा आजूबाजूला जास्त दाब जाणवत असल्यास ते हृदयविकाराच्या झटक्याचे लक्षण असू शकते. अशा वेळी डॉक्टरांना भेटणे आवश्यक आहे.

**आरोग्य चर्चा**

मान, जबड्यामध्ये वेदना, छातीत दुखणे यालाच लोक हृदयविकाराचा झटका मानतात; पण याशिवायही वेदना होऊ शकतात. मान किंवा जबड्यात दुखत असेल तर ते हृदयविकाराचे लक्षण असू शकते. ही वेदना सतत असू शकते. हृदयविकाराच्या झटक्यादरम्यान किंवा आधी श्वास लागणे हे एक सामान्य लक्षण आहे. हे पुरुष आणि स्त्रिया दोघांमध्येही अनुभवाला येऊ शकते. नीट श्वास घेता येत नसेल, थंडी वाजून घाम येत असेल किंवा अंगातून थंड घाम येत असेल तर सावध व्हायला हवे. महिलांमध्ये थंड घाम येणे हे हृदयविकाराचे लक्षण असू शकते.

हृदयविकाराच्या झटक्यादरम्यान महिलांना मळमळ, उलट्या, जबडा, मान किंवा पाठीच्या वरच्या भागात वेदना, छाती किंवा पोटाच्या खालच्या भागात वेदना, श्वास लागणे, मुर्च्छा, अपचन आणि अत्यंत थकवा जाणवू शकतो. याशिवाय झोपेची समस्या, चिंता, चक्कर येणे, अपचन, गॅस तयार होणे ही लक्षणेही दिसू शकतात.

## फ्लूमुळे हृदयविकाराचा धोका दुप्पट

सध्या वातावरणातील बदल अनिश्चित आहेत. या बदलत्या वातावरणाचा मानवी आरोग्यावर परिणाम होत आहे. त्यातच बदल्या जीनशैलीचाही माणसाच्या आरोग्यावर विपरित परिणाम होताना दिसून येत आहे. बहुतांश लोक याचा गांभीर्याने विचार न करता हलक्यात घेत असतात. त्यामुळे आरोग्याकडे दुर्लक्ष होऊन आजारी पडण्याची शक्यता जास्त असते. परिणामी, वातावरणात अचानक झालेल्या बदलांबद्दल अलर्ट रहायला हवे. विशेषत: फ्लूसारखा साधा समजला जाणारा आजारही गांभीर्याने घ्यायची गरज निर्माण झाली आहे. कारण अलीकडेच झालेल्या एका संशोधनानुसार फ्लूच्या लक्षणांमुळे हृदयविकाराचा धोका दुपटीने वाढला आहे.



सध्या व्हायरल फ्लूचे प्रमाण वाढले असून फ्लूचे स्वरूपही सतत बदलत आहे. मानवी आरोग्यावर याचा विपरित परिणाम होत असल्याचे संशोधनातून समोर आले आहे. वारंवार होणारी सर्दी, पडसे याकडे दुर्लक्ष करणे धोक्याचे आहे. अलीकडेच झालेल्या अभ्यासावरून वैद्यकीय शास्त्रज्ञांनी दिलेल्या इशाऱ्यानुसार, कोरोनादरम्यान हृदयातील रक्तवाहिन्यांमधील गुठळ्यांचे प्रमाण वाढल्याचे दिसून आले आहे. यामध्ये हृदयाच्या धमन्यांमध्ये रक्तपुरवठा करताना अडथळा निर्माण होत असतो. अशा वेळी हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता जास्त असल्याचे सांगण्यात आले आहे. याचे कारण फ्लूचे स्वरूप वारंवार बदलत असून मानवी आरोग्यावर वाईट परिणाम होताना दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर हृदयविकाराचा धोका वाढण्यामागे व्हायरल फ्लूच कारणीभूत आहे का, असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत; पण याबद्दल आणखी कोणत्याही प्रकारचे तथ्य जगासमोर आले नसून संशोधन सुरू असल्याचे समजते. कोरोनामुळे हृदयविकाराचा वाढता धोका व्हायरल फ्लूमध्येही आहे का, याचा शोध संशोधकांच्या चमूकडून घेतला जात आहे. तसेच आणखी एका संशोधनातून असे आढळून आले आहे की, फ्लूचा संसर्ग झाल्यानंतर हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. अनेक लोकांना फ्लू नंतर एक आठवड्याने हृदयविकाराचा झटका आल्याचे संशोधकांना आढळून आले आहे.

सध्याचे फ्लूचे बदलते स्वरूप ब्लड क्लॉटिंगचा धोका वाढवण्याची शक्यता आहे. यामध्ये शरीराच्या आतून रक्त जमा होऊन रक्ताच्या गुठळ्या तयार होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे हृदयविकाराचा धोका वाढण्याची जास्त शक्यता असते. याचे कारण कोरोना आणि फ्लूच्या लक्षणांमध्ये बऱ्यापैकी साम्य असल्याचे आढळते. त्यामुळे फ्लूची लक्षणे हलक्यात न घेता सजग राहणे आवश्यक आहे. फ्लू आणि हृदयविकाराचा झटका यामध्ये काही संबंध आहे की नाही, हे जाणून घेण्यासाठी एक संशोधन करण्यात आले आहे. यामध्ये अशाच रूग्णांचा समावेश करण्यात आला होता, ज्यांना हृदयविकाराचा झटका आला म्हणून रूग्णालयात दाखल करण्यात आले. यासाठी प्रयोगशाळेतून माहिती गोळा करण्यात आली होती. यानंतर संशोधकांच्या चमूला दिसून आले की, एकूण ४०१ लोकांना फ्लूमधून बरे झाल्यानंतर एक वर्षाच्या आत हृदयविकाराचा एक झटका नक्की आला होता. यात हृदयविकाराचा झटका आलेल्यांपैकी २५ जण असे होते, जे एका आठवड्याच्या आतच आले होते. या सर्व पार्श्वभूमीवर संशोधाकांच्या चमूने असे निष्कर्ष दिले की, फ्लूचे वाढणे हे कोरोना अचानक वाढण्यासारखेच आहे. त्यामुळे फ्लूची लक्षणे जाणवत असतील तर दुर्लक्ष करणे धोकायदायक ठरू शकते. परिणामी, बदलत्या वातावरणात आरोग्याबाबत विशेष काळजी घेण्याची आवश्यकता आहे.

## अस्थमा असेल तर...

बदलतं हवामान, वाढतं प्रदूषण यामुळे अस्थमाच्या रूग्णांच्या समस्यांमध्ये वाढ होते. फटाक्यांमुळे वातावरणातल्या प्रदुषित घटकांचं प्रमाण वाढतं. या काळात अस्थमा तसंच श्वसनमार्गाशी संबंधित विकार वाढतात. त्यामुळे अस्थमाच्या रूग्णांनी विशेष काळजी घ्यायला हवी.

अस्थमामागचं नेमकं कारण शोधण्यात शास्त्रज्ञांना अजूनही यश आलेलं नाही. अनेक कारणांमुळे श्वसनमार्गात ॲलर्जी निर्माण होऊ शकते. प्रदुषित कण, घरातली धूळ, झुरळं, डास अशा कारणांमुळे श्वसनमार्गाच्या तक्रारी निर्माण होतात. दाणे, अंडी तसंच दुधाची ॲलर्जी असू शकते. अस्थमाला कारणीभूत ठरणारे हे घटक प्रदूषण, वाहनांमधून बाहेर पडणारा धूर, कारखान्यातून बाहेर पडणारा धूर, धान्याची बाजारपेठ, पेरणीचा कालावधी, विषाणूंचा संसर्ग, रंगाचा वास यामुळे अधिक तीव्र स्वरूप धारण करू शकतात. खोकला, छातीतून घरघर असा आवाज येणं, श्वास घ्यायला त्रास होणं, छातीत अवघडलेपण जाणवणं, छातीत दुखणं अशी अस्थमाची लक्षणं असतात. अस्थमाच्या रूग्णांनी इनहेलर सोबत ठेवायला हवं. लक्षणं दिसू लागली की इनहेलर वापरायला हवा. धुरापासून लांब राहा. भरपूर सॅलड खा. तेलकट, तुपट पदार्थांपासून लांब रहा. न्याहरीला फळं खा. अर्धवट शिजवलेल्या भाज्या खा. भरपूर पाणी प्या. दररोज प्राणायाम करा तसंच चालताना श्वासाकडे लक्ष ठेवा. व्यायाम करतानाही श्वसनाकडे लक्ष द्या. श्वासांची एक लय ठेवा. फटाके फुटत असताना घरात थांबा. औषध घेतल्यानंतरही अस्थमाची लक्षणं जाणवत असतील तर तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्या. तीव्र स्वरूपाचा अस्थमा असेल तर रूग्णांनी अधिक काळजी घेणं गरजेचं आहे.



**उन्हाळा सुरू झाला आहे. कडक सूर्यप्रकाशामुळे सनबर्न आणि टॅनिंगची समस्या खूप सामान्य आहे; पण सूर्यप्रकाशामुळे सन पॉयझनिंगदेखील होऊ शकते. सनबर्न आणि सन पॉयझनिंग हे एकच आहे, असे अनेकांना वाटते; परंतु सन पॉयझनिंग हे सनबर्नपेक्षा जास्त धोकादायक आहे.**

## कडक सूर्यप्रकाशामुळे विषबाधेचा धोका

**आरोग्यवेध**

सन पॉयझनिंग हा सनबर्नचा घातक प्रकार आहे. आपण सूर्याच्या पॅराव्हायोलेट किरणांच्या संपर्कात बराच काळ असतो तेव्हा असे होते. ही समस्या दूर करण्यासाठी वैद्यकीय उपचार घ्यावे लागतात. त्वचेची जळजळ सुरू होते आणि खवले तयार होऊ लागतात. त्वचा लालसर होणे, वेदना होणे, त्वचेची खपली निघून फोड येणे, डोकेदुखी, चक्कर येणे, अतिसार होणे, गोंधळल्यासारखे वाटणे, मळमळ किंवा उलट्या होणे, भोवळ येणे, सन पॉयझनिंग वाढल्यास पू किंवा पाणी येणे ही सन पॉयझिंगची लक्षणे आहेत. यामुळे काही दिवसातच वेदना वाढून सूज येऊ लागते. सूर्यप्रकाशामुळे शरीरातील इलेक्ट्रोलाईट्स निघून जातात, तेव्हा गंभीर लक्षणे दिसू लागतात.

पॉयझनिंगपासून बचाव करण्यासाठी सनस्क्रीन-सनस्क्रीन लोशन वापरावे, संपूर्ण त्वचा झाकल्यानंतरच घराबाहेर पडावे, बाहेर जाताना सुती कपडे घालावेत आणि घट्ट कपडे घालणे टाळावे, असे सांगितले जाते. बाहेर फिरताना गडद रंगाचे कपडे घालणे टाळावे, टोपी किंवा कापडाने डोके झाकावे, सकाळी दहा ते सायंकाळी चार वाजेपर्यंत घराबाहेर जाण्याचे टाळावे, स्वतःला जास्तीत जास्त हायड्रेट ठेवण्याचा प्रयत्न करावा, असेही सांगितले जाते. खूप घाम येत असेल तर दर दोन तासांनी सनस्क्रीन लावावे. उन्हाळ्यात त्वचेची काळजी घेण्यासाठी थोडे जास्त प्रयत्न करावे लागतात. कारण योग्य काळजी न घेतल्यास उन्हाळ्यात त्वचा निर्जीव, तेलकट आणि निस्तेज बनते. कडक उन्हामुळे सनबर्न, रॅशेस, पिंपल्स, टॅनिंग, मेलास्मा आणि सन ॲलर्जी अशा अनेक समस्या उद्‌भवतात. दिवसातून एकदाच सनस्क्रीन लावणे, मॉईश्चरायझिंग न करणे, भरपूर मेक-अप करणे, स्वत:ला हायड्रेट न ठेवणे या चुका उन्हाळ्यात करू नयेत, असे तज्ज्ञ सांगत आहेत.



## मधुमेहावर नियंत्रण ठेवायचेय, मग हे टाळा...

**नगर :** मधुमेहाच्या रुग्णांनी काही पदार्थ टाळावेत. ते न टाळल्यास रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते. मधुमेह हा देशात वाढलेला एक प्रमुख आजार आहे. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढते. या आजारावर वेळीच उपचार न केल्यास शरीरात इतर अनेक आजार उद्‌भवू शकतात. रक्तात दीर्घकाळ ग्लुकोजची उपस्थिती धोकादायक आहे. यामुळेच मधुमेही रुग्णांनी आरोग्याची विशेष काळजी घेतली पाहिजे.

मधुमेहामध्ये सर्वाधिक टाळण्याची गरज असलेली बाब म्हणजे साखर किंवा साखरेपासून बनवलेल्या वस्तू. साखरेपासून बनवलेल्या गोष्टींचा विचार केल्यास मधुमेहींना अनेकदा काय खावे आणि काय खाऊ नये याबाबत संभ्रम असतो. जास्त साखरेचे पदार्थ मधुमेहाच्या रुग्णांसाठी विषापेक्षा कमी नाहीत. कारण त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी अचानक वाढू शकते.

दुधाची चव वाढवण्यासाठी लोक अनेकदा त्यात वेगवेगळ्या गोष्टी टाकल्या जातात. त्यापैकी एक म्हणजे चॉकलेट. बरेच लोक दुधात चॉकलेट मिसळतात. त्यात भरपूर साखर असते. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी लगेच वाढू शकते. म्हणूनच मधुमेहाच्या रुग्णांनी चॉकलेट दूध पिणे आवर्जून टाळावे. दह्याचे सेवन आपल्या आरोग्यासाठी अनेक प्रकारे फायदेशीर आहे. आतड्यांसाठी ही संजीवनी औषधी वनस्पतीपेक्षा कमी नाही; मात्र दह्यामध्ये कोणत्याही प्रकारची चव मिसळून सेवन करणे धोकादायक आहे. चवीचे दही मधुमेहाच्या रुग्णांची समस्या वाढवू शकते. चवीच्या दह्यात कृत्रिम साखर असते. ती थेट रक्तात जाते आणि साखरेची पातळी वाढवते.

**आरोग्यवेध**

जास्त प्रमाणात कॉफी पिणे नेहमीच धोकादायक मानले गेले आहे; पण काही लोक त्यात चवीसाठी काही पदार्थ घालून अधिक धोकादायक बनवतात. चवीच्या कॉफीमध्ये असलेल्या साखरेमुळे रक्तातील साखरेची पातळी त्वरित वाढू शकते. यामुळेच चवीची कॉफी आरोग्यासाठी घातक आहे. मधुमेहाच्या रुग्णांना नेहमी अशी फळे टाळण्याचा सल्ला दिला जातो, ज्यामध्ये साखरेचे प्रमाण आधीच जास्त असते. आंबा आणि अननस यांसारख्या फळांमध्ये साखरेचे प्रमाण खूप जास्त असते. वी फळे साखरेची पातळी अचानक वाढवू शकतात. लोक बरेचदा ब्रेड, समोसा, चाउमीन यासारख्या फास्ट फूडमध्ये टोमॅटो सॉस मिसळून खातात. पण केचपमध्ये साखरेचे प्रमाण खूप जास्त असते. त्यामुळे साखरेची पातळी वाढू शकते.

**नवसंशोधन**

### स्थूलपणाकडे दुर्लक्ष नको!

तुम्ही स्थूल असूनही आरोग्यदायी जीवन जगत असाल, मधुमेह-उच्च रक्तदाब असे विकारही जडलेले नसतील पण म्हणून निष्काळजीपणा करू नका. निरोगी पण स्थूल असलेल्या व्यक्तींमध्ये हृदय बंद पडण्याची शक्यता ९६ टक्क्यांपर्यंत असू शकते, असं नुकत्याच झालेल्या एका संशोधनातून समोर आलं आहे. सर्वसामान्य वजन असलेल्यांच्या तुलनेत स्थूल पण निरोगी जीवन जगणाऱ्यांना हृदयविकार जडण्याची शक्यता ४९ टक्क्यांनी अधिक असते. बर्मिंगहॅम विद्यापीठात याबाबत संशोधन करण्यात आलं. आरोग्यदायी स्थूलत्व ही संकल्पना अनेक ठिकाणी मांडली जाते. पण या संशोधनाने या संकल्पनेवरच प्रश्नचिन्ह निर्माण केलं आहे. त्यामुळे कोणतेही विकार नसलेल्या स्थूल माणसांनीही वजन कमी करण्यावर भर द्यायला हवा, असं डॉक्टरांचं म्हणणं आहे.



**आजीबाईचा बटवा**

### घसा दुखत असेल तर

बदलत्या हवामानामुळे घसादुखीसारखी समस्या अनेकांना जाणवते. ही समस्या दूर करण्यासाठी काही घरगुती उपाय करता येतात. घसा दुखत असेल तर गरम पाणी, चहा, कॉफी प्या. यामुळे घसा शेकला जाईल. मिठाच्या पाण्याने गुळण्या करता येतील. मिठाच्या पाण्याच्या गुळण्या केल्यामुळे घशाची जळजळ कमी होईल तसंच घसा दुखण्याचं प्रमाणही कमी होईल. आलं घातलेला चहा प्या किंवा आल्याचे तुकडे चघळा. यामुळे घशाला आराम मिळेल. तुळशीची पानं घालून उकळलेलं पाणी पिता येईल.



**मनारोग्य**

### लाभ विपश्यनेचे...

मानसिक आरोग्य जपण्यासाठी केल्या जाणाऱ्या विविध उपायांपैकी एक म्हणजे विपश्यना. विपश्यना हा मानसिक आरोग्य जपण्याचा आध्यात्मिक मार्ग आहे. विपश्यना हा ध्यानधारणेचा एक प्रकार आहे. विपश्यनेमुळे अनेक लाभ होतात. सध्या ताणांचं प्रमाण प्रचंड वाढलं आहे. विपश्यना केल्याने ताणतणाव कमी होतो, एकाग्रता वाढते, उच्च रक्तदाबाची समस्या कमी होते. मानसिकदृष्ट्या आपण सक्षम होतो. नैराश्य कमी होतं. मेंदूची क्षमता वाढते. वागणुकीत बदल होतो. विचार सकारात्मक बनतात.



# अहमदनगर जिल्हा चेस सर्कल मान्यतेने २० एप्रिल रोजी खुल्या जलद बुद्धिबळ स्पर्धा

नगर – बुद्धीबळ स्पर्धकांसाठी अहिल्यानगर येथील आठरे पाटील बालगृह, रेणुकामाता मंदिर समोर, एम.आय.डी.सी. येथे २० एप्रिल रोजी सकाळी ९.३० वा. खुल्या जलद बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. स्पर्धा फीडेच्या नियमानुसार असेल तसेच वेळ मर्यादा १० मि. ३ से. राहील. बक्षिस वितरण २० एप्रिल रोजी सायं ६.३० वा. होईल, अशी माहिती स्पर्धा प्रमुख सुनिल घोडेराव यांनी दिली.

ही स्पर्धा खुला गट व बाल गट (१४ वर्ष आतील) अशी होणार आहे. खुला गट विजेत्यांना अनुक्रमे ७००१/- ट्रॉफि, ५००१ /- ट्रॉफि, ३००१ /- , १००१ /-, ७०१ /-, ६०१ /-, ५०१ /-, ४०१ /-, व बाल गट विजेत्यांना अनुक्रमे १५०१/- ट्रॉफि, १००१ /- ट्रॉफि, ७०१ /-, ६०१ /-, ५०१ /-, ४५१ /-, ४०१ /-, ३५१ /-, ३०१/- असे रोख पारितोषिके देण्यात येणार आहे. या स्पर्धेचे स्पर्धा पंच देवेंद्र ढोकळे व प्रशांत धंगेकर हे असणार आहेत. तसेच उत्तेजनार्थ खुल्या गटामध्ये ज्येष्ठ, महिला व दिव्यांग स्पर्धकांसाठी रु. ४५१, रू.३५१ तसेच १५, १२, १०, ८ वर्षाच्या आतील स्पर्धकांसाठी प्रत्येकी ५ मेडल बक्षिसे देण्यात येतील.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नावनोंदणी आवश्यक असून नावनोंदणीसाठी श्रिया लेडीज शॉपी–९२२६३५३०१४, साई श्रद्धा किराणा–९८५०६५४९५५, शिव प्रसाद काळे–९२८४३४०७१७, यशवंत होजीयरी ९३२६०९२५०१, नितीन सोळके – ९८९०४८९०३३,विशाल गुजराथी – ९४०५००५५३४, सागर गांधी ९०२८०२६९४५, मनीष जसवानी–८८५५०२३३२, डॉ. विनय कुचेरिया–९४२३४६८१४०, सतिष गाली – ९५९५४१४१७९ यांच्याशी संपर्क साधावा. या स्पर्धेत स्पर्धकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन उपनगर बुद्धीबळ सेवा संस्था, अहिल्यानगर, अहमदनगर जिल्हा चेस सर्कल यांच्या वतीने करण्यात आले.

स्पर्धा यशस्वीतेसाठी राहुल जामगावकर, सुभाष दराडे, विकास पारगावकर, मनोज भुजबळ, शरफोद्दीन सय्यद, रावसाहेब कर्डिले, संजय सप्रे, अजित जाधव, नितीन परदेशी, रामराव पगार, मंदार धर्माधिकारी, तुषार गट, सुनिल जोशी, सुरेश शिरसाठ, राहुल जरे, संदेश भाकरे, प्रिती नगरकर, संगीता पुजारी, मनिषा घोडेराव, विता जमदाडे, आयशा सय्यद, मंगला भिसे, सुभाष ठोंबे, हेमंत मराठे, अंबादास भोसले, रावसाहेब कर्डिले, रीना जमधडे, हर्षदा सुराणा, नफिसा शेख आदी परिश्रम घेत आहेत.

या स्पर्धेसाठी डि एल बी ट्रस्ट, विद्याधन चेस अकादमी, सुकृती महिला बचत गट, बोल्हेगाव, अ.नगर, प्रगती महिला बुद्धिबळ सोसायटी, बोल्हेगांव फाटा, हेमंत सुराणा, नागापूर यांचे विशेष सहकार्य लाभत ओहत.

# नाना पाटील वस्ताद तालिमच्यावतीने हनुमान जयंती साजरी


हनुमान जयंतीनिमित्त नाना पाटील वस्ताद तालिमच्यावतीने कावडीने आणलेल्या पवित्र पाण्याने अभिषेक करण्यात आला.

नगर – शक्ती आणि भक्तीचा मिलाप म्हणजे बजरंगबली होय. प्रभु रामचंद्रांची नि:स्सीम भक्ती करुन निष्ठा कशी असावी भगवंत हनुमानांनी आपल्या सेवेतून दाखवून दिले आहे. हा आदर्श आपल्या जीवनात अंगीकृत करण्याची गरज आहे. हनुमान जयंतीनिमित्त महाप्रसादाचे वाटपातून सामाजिक ऐक्य निर्माण होण्यास मदत होते. प्रसादाचे महत्म्य मोठे असल्याने भाविकांना लाभ घेऊन तुप्त होत आहे. ही तृप्तीच आपणा सर्वांना समाधान देणारी आहे, असे प्रतिपादन मनपा माजी स्थायी समिती सभापती गणेश कवडे यांनी केले.

हनुमान जयंतीनिमित्त नाना पाटील वस्ताद तालिमच्यावतीने कावडीने आणलेल्या पवित्र पाण्याने अभिषेक करण्यात आला. याप्रसंगी मनपा माजी स्थायी समिती सभापती गणेश कवडे, पै. मन्नी शिंदे, अनिल कवडे, पै. रामभाऊ नळकांडे, बजरंग महाराज शेळके, राधेशाम धूत, पै. मळू वामन, दत्ता ठाणगे, अमर शिंदे, नितिन रोहकले, योगीराज वामन, शिवाजी गुंजाळ, अरुण कदम, पुष्कर गुंजाळ, धीरज रोहकले, बंडू शेळके, निलेश काळे, अतुल वाकचौरे, राजु म्हस्के, ननु काळे, बापू दिवेकर, ओंकार कवडे, पळसकर आदि उपस्थित होते.

गणेश कवडे म्हणाले, हनुमान जयंतीची नालेगांवची मोठी परंपरा आहे. दरवर्षी नालेगांव येथील नाना पाटील वस्ताद तालिम येथील युवकांनी सालाबाद प्रमाणे प्रवरासंगम येथून कावडीने पाणी आणून जलाभिषेक केला जातो. युवकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री हनुमानाची उपासना करुन अनेक कुस्तीची मैदानी गाजवली आहेत. नाना पाटील वस्ताद तालिमचे जिर्णोद्धाराचे पूर्ण झाले असून लवकरच त्याचा लोकार्पण कार्यक्रम करण्यात येईल असे गणेश कवडे यांनी सांगितले.

# चहा विक्रेत्याचा मुलगा झाला एमबीबीएस डॉक्टर


मुंबई येथील नायर हॉस्पिटल येथे प्रदीप ढवळे यांनी एमबीबीएस पदवी घेतली. यावेळी त्याच्यासमवेत वडील प्रकाश ढवळे.

जामखेड – बारावी परिक्षा पास झाल्यानंतर कोणतेही लाज न बाळगता चहाच्या दुकानात सहा वर्षे काम केले. यानंतर जामखेड नगर रस्त्याच्या कडेला दोन बाकडे व खूर्च्या टाकून अल्प खर्चात चहाचा व्यवसाय एका वडाच्या झाडाखाली सुरू केला. तर पत्नी राधीका ही शेती पाहायची. मुले लहानचे मोठे होत असताना त्यांची बुध्दीमत्ता पाहुन दोन्ही मुलांना शेती व चहाच्या दुकानात न आणता त्यांच्या शिक्षणावर भर दिला. या दोन्ही मुलांनी आईवडिलांच्या कष्टाचे चीज केले. थोरला मुलगा एमबीबीएस डॉक्टर झाला तर दुसरा मुलगा एमबीबीएसच्या दुसऱ्या वर्षाला आहे.

छोट्याशा चहाच्या व्यावसायावर व अडचणींचा सामना करताना प्रकाश उर्फ (बंडु) ढवळे यांनी यांनी आपली मुले थोरला प्रदीप व धाकटा रोहीत या दोन्ही मुलांचे शिक्षण मातकुळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत केले. यानंतर जामखेड येथे पाचवी ते बारावीचे शिक्षण ल. ना. होशिंग विद्यालयात झाले. प्रदीपने नेट परिक्षा दिली. नेट परिक्षेत मिळालेल्या गुणामुळे त्याचा मुंबई येथील प्रतिष्ठित नायर हॉस्पिटल मेडीकल कॉलेजमध्ये शासकीय कोट्यातून नंबर लागला. घरच्या परिस्थितीची जाण असलेल्या प्रदीपने मेहनतीने, चिकाटीने स्वत:ला सिद्ध केले आहे. शेतात आई काबाड कष्ट करते तर वडील चहाचे दुकान चालवतात आशा आईवडिलांच्या कष्टाची जाण ठेवत प्रदीपने साडेपाच वर्षाच्या शिक्षणानंतर एमबीबीएस ही पदवी प्राप्त करून आईवडिलांचा विश्वास सार्थ ठरवला आहे. डॉ. प्रदीप याचे हे यश हे केवळ त्यांच्या कुटुंबासाठी नव्हे, तर संपूर्ण जामखेड व आष्टी तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे. जिद्द, मेहनत आणि चिकाटी असल्यास कोणतीही पार्श्वभूमी आड येत नाही. हे या यातुन सिध्द होत आहे.



'रामकृष्ण'मध्ये 'आई–बाबांची शाळा' हा अभिनव एकदिवसीय कार्यक्रम घेण्यात आला.

# 'रामकृष्ण'मध्ये झाली 'आई–बाबांची शाळा'

नगर – श्री रामकृष्ण एज्युकेशन फौंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मेडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना ज्युनियर कॉलेज येथे सेंटर ऑफ एक्सेलेन्स विभागांतर्गत महास्कील टेक इनोव्हेटिव्ह फौंडेशन आणि ब्रेनटेक कौन्सेलिंग थेरपी यांच्या समन्वयातून 'आई–बाबांची शाळा' हा अभिनव एकदिवसीय कार्यक्रम घेण्यात आला. यामधे डॉ. सुरेश भारती यांनी उपस्थित पालकांना मार्गदर्शन केले.

कोरोना काळानंतर मुलांच्या वर्तन समस्यावर काम करण्याची गरज निर्माण झाली असून दिवसेंदिवस आई–बाबा आणि मुलांमध्ये दुरावा निर्माण होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाढणाऱ्या ताणतणावाचे सकारात्मक निवारण होणे आवश्यक असून याची पहिली पायरी म्हणजे पालकांनी मुलांसाठी वेळ देणे होय असे प्रतीपादन डॉ.सुरेश भारती यांनी 'आई–बाबांची शाळा' या प्रसंगी केले.

आपल्या मुलांची वाढ होत असताना पालकांमध्ये कोणती कौशल्ये असली पाहिजेत, पालकत्वाचे प्रकार कोणते आहेत? सर्वच मुलांची बौद्धिक क्षमता ही सारखी असते का? या आणि अशा मुलभूत प्रश्नावर 'प्राण्यांची भरलेली अफलातून शाळा' अशा गोष्टीमय स्वरुपात डॉक्टर भारती सरांनी पालकांना भेडसावणाऱ्या प्रश्नावर विस्तृत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीरामकृष्ण संस्थेचे विश्वस्त श्रीगोपाल जाखोटिया यांनी केले असून, पालकांना संगोपनाचे विस्तृत मार्गदर्शन डॉक्टर सुरेश भारती यांनी केले आणि यापुढे होणाऱ्या ११ दिवसाच्या ऑनलाइन कार्यशाळेमध्ये पालकांनी सहभागी व्हावे असे आवाहन शाळेच्या वतीने प्राचार्या जेऊरकर यांनी केले.

सूत्रसंचालन श्रेयकुमार गुंडू यांनी केले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष व शाळा समितीचे चेअरमन नंदकुमार झंवर, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना व राजेश झंवर, सचिव डॉ. शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक यांनी शुभेच्छा दिल्या.

# नगरमध्ये १६ एप्रिलला मोफत मराठा वधू वर परिचय मेळावा

नगर – सरपंच परिषद मुंबई, महाराष्ट्र व मराठा सोयरीक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने नगर शहरात कोहिनूर मंगल कार्यालय येथे ९६ वा मोफत मराठा वधू वर परिचय मेळावा आयोजित केला आहे, अशी माहिती सरपंच परिषद मुंबईचे राज्य कोअर कमिटी प्रमुख आबासाहेब सोनवणे पाटील, मराठा सोयरीक संस्थेच्या संचालिका जयश्री अशोक कुटे व कोहिनूर मंगल कार्यालयाचे संचालक राजेंद्र उदागे पाटील यांनी दिली आहे. या मोफत मेळाव्याचे उद्घाटन सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राचे संस्थापक अध्यक्ष दत्ता काकडे यांच्या हस्ते होणार आहे.

मेळावा १६ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वा. अहिल्यानगर शहरातील कोहिनूर मंगल कार्यालय, गुलमोहर रोड येथे होणार आहे. या मेळाव्यात सहभागी व्हावे असे आवाहन जगदंब फाउंडेशन अध्यक्ष गणेश लंघे, मराठा सोयरीकचे अध्यक्ष अशोक कुटे, शिरूर तालुका मित्रपरिवार पुणे अध्यक्ष बाळा पऱ्हाड, शिवसेना आळंदी शहराध्यक्ष राहुल चव्हाण, सेवानिवृत्त वनाधिकारी प्रभाकर कड पाटील, नानासाहेब दानवे, प्रमोद झावरे, संपतराव सोनवणे, मधुकर निकम, अन्नपूर्णा ढम, गोरक्षनाथ पटारे, संदीप जगताप, अमोल धनवडे, मोहन हेलकुटे, योगेश कोतकर, पारुनाथ ढोकळे, राजेंद्र औताडे, राजेंद्र भापकर आदींनी केले आहे.

मराठा सोयरीक संस्थेमार्फत पुढील मेळाव्यांपैकी ९७ वा मोफत मेळावा २० एप्रिल रोजी चंदननगर (पुणे) येथे व ९८ वा मोफत मेळावा २७ एप्रिल रोजी आळंदी येथे आयोजित केले आहेत. मेळाव्यासाठी येताना वधू– वरांनी स्वतः आधार कार्ड झेरॉक्स, बायोडाटा घेऊन पालकांसह मेळाव्यास यायचे आहे. अनेक वेगवेगळ्या तालुक्यातील व वेगवेगळ्या जिल्ह्यातील सर्व प्रकारचे स्थळे या ठिकाणी बघायला मिळणार आहेत. माहितीसाठी ७४४७७८५९१०. मेळाव्यामध्ये मुला मुलींना पालकांना प्रत्यक्ष एकमेकांना बघता येते. मराठा सोयरीक संस्थेने आतापर्यंत ९५ यशस्वी वधू वर मेळावे घेतले आहेत. या संस्थेकडून आतापर्यंत ४५६० लग्न पार पाडलेले आहेत. त्यापैकी ६५० लग्न हे विधवा, विदुर, घटस्फोटीत यांचे लग्न पार पडलेले आहेत.

# माळीवाडा येथील शनी मारुती मंदिरात विशेष महापुजा

## शहरात विविध ठिकाणी 'बजरंग बली की जय' घोषात हनुमान जयंती उत्सहात साजरी


हनुमान जयंतीनिमित्त माळीवाडा येथील श्री शनी–मारुती मंदिरात हनुमान जयंती उत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

नगर – माळीवाडा येथील शनी–मारुती मंदिर येथे श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ठिक ६ वा. जन्मोत्सवाच्यावेळी श्री विशाल गणपती मंदिराचे पुजारी आदित्यनाथ महाराज यांच्या हस्ते अभिषेक करुन महापुजा करण्यात आली. भजनी मंडळाच्या महिलांनी पाळणा हलवून हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी देवस्थानचे सचिव अशोकराव कानडे, विश्वस्त रंगनाथ फुलसौंदर, विजय कोथिंबीरे, नितीन पुंड, राजेश पारीख आनंद सत्रे, लक्ष्मीकांत हेडा आदिंसह भाविक भक्त उपस्थित होते. यावेळी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच मंदिर परिसर फुलांसह आकर्षक सजावट करण्यात आली होती.

नगर शहरामध्ये विविध मंडळांनी हनुमान जयंतीनिमित्त विविध मंडळांनी आकर्षक अशा मुर्ती उभारुन जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच शहरातील विविध तालिमीमध्ये आकर्षक रोषणाई करुन युवकांनी कावडीने आणलेल्या पाण्याने अभिषेक करण्यात आले. नगर शहरातील स्टेट बँक चौक, सर्जेपुरा, दिल्लीगेट, लक्ष्मी कारंजा, माळीवाडा, नेप्तीगेट, झेंडीगेट, नेता सुभाष चौक, नालेगांव, वारुळाचा मारुती, नवग्रह मंदिर, भुतकरवाडी, श्रमिकनगर, पावन हनुमान मंदिर, बालिकाश्रम रोड, खाकीदास बाबा मठ, नित्यसेवा सोसायटी, मार्कंडेय सोसायटी गुलमोहोर रोड, तपोवन, भोसले आखाडा, अरणगांव रोड, रेल्वेस्टेशन, केडगांव, एकनाथनगर, भिंगार येथील रोकडेश्वर मंदिरावर आकर्षक सजावट करण्यात आली होती. भाविकांनी पहाटेपासूनच दर्शनासाठीसाठी रांगा लावल्या होत्या. रुईच्या पानांचा हार, मंदिराबाहेर नारळ, टरबुज–खरबुजाचा प्रसादाचे आयोजन करण्यात होते.

कौठीची तालिम, नानापाटील वस्ताद, वाडिया पार्क तालिम, गणपतीची तालिम, सातपुते तालिम, झारेकरगल्ली आदी ठिकाणीची तालमींवर रोषणाई करुन सजावट करण्यात आली होती.

हनुमान जयंतीनिमित्त गेल्या अनेक दिवसांपासून अहिल्यानगर शहरात चौका–चौकात हनुमान चालिसा पाठाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, श्री रामभक्त हनुमान सत्संग मंडळ, मंगल भक्त सेवा मंडळ आदि मंडळाने शहरात व उपनगरात हनुमान चालिसाचे पठण करुन भाविकांना मंत्रमुग्ध केले.

संकटमोचन हनुमान सत्संग मंडळाच्या वतीने माळीवाडा शनी–मारुती मंदिर येथे पहाटे हनुमान चालिसाचे आयोजन करण्यात आले होते.


तांगेगल्ली येथील शनी मारुती मंदिरात हनुमान जयंतीनिमित्त भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# शनी मारुती मंदिरात हनुमान जयंती उत्साहात

## भाविकांना प्रसाद वाटप

नगर – सालाबाद प्रमाणे तांगेगल्ली येथील शनि मारुती मंडळाच्या वतीने हनुमान जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त शनि मारुती मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. तसेच रंगरंगोटी करण्यात आली होती. पहाटे हनुमान मूर्तीस लघु रुद्राभिषेक करण्यात आला. महाअभिषेक व पूजा करण्यात आली. याप्रसंगी हनुमान भक्त उपस्थित होते. पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

दुपारी महाआरतीनंतर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी स्थायी समिती माजी सभापती गणेश कवडे, माजी नगरसेवक संभाजी लोंढे, अजय चितळे, भाजपा ओबीसी जन मोर्चाचे अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, गणेश शिंदे, आदिनाथ शिंदे, वैभव शिंदे, निखिल सोनवणे, कार्तिक जाधव, सचिन धरम, प्रतीक जाधव, धनंजय शिंदे, सचिन घाडगे, ऋषिकेश शिंदे, आर्यन सोनवणे, सागर साळवे, सागर कदम, अरुण एडके, जनार्दन साळवे, अर्जुन स्वामी, मिलिंद सुडके आदी उपस्थित होते.


जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर स्वामी यांच्या जयंतीनिमित्त पारनेर तालुक्यातील खडकवाडी येथे तालुकास्तरीय भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवचे आयोजन करण्यात आले.

# भगवान महावीर जयंतीनिमित्त खडकवाडी येथे जैन भवनसाठी ५० लाख रुपयांचा निधी जाहीर

## देवेंद्र मुनावत परिवाराकडून जैन श्रावक संघासाठी २० गुंठे जागा दान

नगर – जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर स्वामी यांच्या जयंतीनिमित्त पारनेर तालुक्यातील खडकवाडी येथे तालुकास्तरीय भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी आमदार काशिनाथ दाते व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी खडकवाडी येथील जैन भवनसाठी प्रत्येकी २५ लाख रुपये, असे एकूण ५० लाख रुपयांचा निधी देण्याची घोषणा केली. तर देवेंद्र मुनावत परिवाराकडून जैन श्रावक संघासाठी २० गुंठे जागा दान देण्यात आली.

या कार्यक्रमाला आमदार काशिनाथ दाते, सुजित झावरे पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विश्वनाथ कोरडे, राष्ट्रवादी युवती काँग्रेस पार्टीच्या प्रदेशाध्यक्षा संध्याताई सोनवणे, शिवसेना तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे, कुंदन काका साखला, बाजार समितीचे संचालक अशोक कटारिया, उद्योजक संतोष भंडारी, बाळासाहेब गुगळे, सागर साखला, चेतन भळगट, प्रदिप गांधी, सुनिल भंडारी, प्रदिप गुगळे, पंकज पिपाडा, विलास कटारीया, सुभाष लुंकड, राजेंद्र गांधी, देसरडा सर आदी उपस्थित होते.

# मिलिटरी इंजिनिअर सर्व्हिसेस एम्प्लॉईज सोसायटीच्या चेअरमनपदी शेखर व्यवहारे



नगर – संरक्षण मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत मिलिटरी इंजिनिअर सर्व्हिसेस एम्प्लॉईज मल्टीस्टेट को–ऑप क्रेडिट सोसायटी लि. पुणे या संस्थेचे कार्यक्षेत्र १२ राज्य असून, या संस्थेची मासिक बैठक नुकतीच संस्थेच्या मुख्य कार्यालय, पुणे येथे पार पडली. या बैठकीत अहिल्यानगर येथील शेखर शामराव व्यवहारे यांची बहुमताने चेअरमनपदी निवड करण्यात आली.

२५ जानेवारी १९२६ रोजी स्थापन झालेल्या ही संस्था शताब्दीच्या उंबरठ्यावर असताना १२० करोड पेक्षा जास्त उलाढाल असणाऱ्या संस्थेच्या चेअरमनपदी निवड हा बहुमान अहिल्यानगरच्या पुत्राला मिळाला. शेखर व्यवहारे सध्या मिलिटरी इंजिनीरिंग सर्व्हिसेस सेवेत सिनियर ॲडमिन असिस्टंट म्हणून मुंबई येथे कार्यरत आहे.

# हनुमान जयंतीनिमित्त गाडगीळ पटांगणात रंगला पालखी सोहळा

## श्री हनुमानजी प्रभू रामाचे सेवक आहे असे म्हणत, नम्रतेने जीवन जगले : दत्तात्रय मुदगल


हनुमान जयंतीनिमित्त नालेगाव गाडगीळ पटांगण येथे पालखी सोहळा रंगला. (छाया – लहू दळवी)

नगर – श्री हनुमान जयंतीनिमित्त नालेगाव येथील गाडगीळ पटांगणामध्ये भव्य पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. उत्सव–मूर्तीच्या पालखीची मिरवणूक ढोल–ताशांच्या गजरात, टाळ–मृदंगाच्या साथीत आणि जयघोषात भक्तिमय वातावरणात पार पडली. या पालखी सोहळ्यात गावातील महिला, पुरुष, युवक आणि लहानग्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. भक्तगणांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून भगवंताच्या नामस्मरणात सहभागी होत सोहळ्याची शोभा वाढवली आणि टाळ मृदूंगाच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी परिसरात सर्वत्र उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी ग्रामस्तांनी सडा रांगोळी टाकत पालखीचे स्वागत करण्यात आले. यावेळी भक्तांनी फुगडी खेळण्याचा आनंद घेतला.

नालेगाव गाडगीळ पटांगण येथे हनुमान जयंती– निमित्त पालखी सोहळा मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल, सुनीता मुदगल उपस्थित होते.

दत्तात्रय मुदगल म्हणाले की, आज आपण प्रभू श्रीरामाचे प्रिय भक्त, श्री हनुमानजींच्या जयंतीनिमित्त येथे एकत्र आलो आहोत. हनुमानजी हे पराक्रम, भक्ती, नम्रता आणि निष्ठेचं मूर्तिमंत प्रतीक आहेत. हनुमानजींचं चरित्र हे अत्यंत प्रेरणादायी आहे. रामायणात त्यांच्या पराक्रमाने आणि बुद्धीने संपूर्ण विश्व थक्क झाले. त्यांचा नम्र स्वभाव आणि प्रभू रामावर असलेली अखंड भक्ती. त्यांनी कधीही आपला अभिमान केला नाही, उलट मी प्रभू रामाचा सेवक आहे असे म्हणत, नम्रतेने जीवन जगले. आपल्याला हनुमान जयंती निमित्त हाच संदेश घेऊन जायचा आहे, की आपण ही त्यांच्या गुणांचा आदर्श घेऊन, सत्य, निष्ठा, मेहनत आणि भक्ती या मूल्यांनी आपले जीवन घडवूया, असे ते म्हणाले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

